

बादळी वारा व पाऊस थांबविण्याचा चमत्कार

जानेवारी

६० पैसे

१९७७

# अनुक्रमणिका — जानेवारी १९७७


| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय | — |
| २. | गाठीभेटी – साईभक्त श्री. पणशीकर | श्री. सदानंद चेंदवणकर |
| ३. | युगावतार साईबाबा | ,, चंद्रकांत सामंत |
| ४. | श्री साईनाथ महाराज | ,, पांडुरंग कृष्ण बेंगरी |
| ५. | श्री साईबाबांची भक्ति | ,, मुरलीधर घोलप |
| ६. | दीपज्योती नमोस्तुते | ,, विनायक पाठक |
| ७. | बाबांनी प्रसाद दिला | कु. शालिनी देशपांडे |
| ८. | अनुभवाने श्री साईभक्त झालो | श्री. बाळकृष्ण कुलकर्णी |
| ९. | प्रसंगी धावून येणारे बाबा | ,, दीपक राजाराम पांडव |
| १०. | बाबांनी माझे कुंकू राखले | सौ. नीला प्रभु |
| ११. | ध्येय | श्री. शाम जुवळे |
| १२. | साईकृपेमुळे भयानक विघ्न टळले | सौ. विमलादेवी |
| १३. | वाचकांचा पत्रव्यवहार | — |
| १४. | ४६ वा वार्षिक कोजागिरी पोर्णिमा उत्सव, शिर्डी | — |
| १५. | श्री साई सेवा धाम, पिळगांव | — |
| १६. | श्री साईबाबा मंदिर, धंतोली, नागपूर | श्री. चंद्रकांत सामंत |
| १७. | शिर्डी वृत्त – सप्टेंबर ७६ | — |
| १८. | शिर्डी वृत्त – ऑक्टोबर – नोव्हेंबर ७६ | — |
| १९. | महानिर्वाण | कु. शशिकला साळगांवकर |
| २०. | आरति गाऊ साईनाथा | श्री. श्रीराम आठवले |
| २१. | साईलीला | ,, अशोक वाळंज |
| २२. | श्री साई स्तवन | ,, वि. वा. कोलगेकर |
| २३. | धर वाट शिर्डीची | ,, पांडुरंग मिराशे |
| २४. | प्रगटले साईरुप श्रीहरी | ,, चकोर आजगांवकर |
| २५. | रीत तुझी न्यारी | सौ. सुशीलाबाई हजारे |
| २६. | धन्य धन्य ते साईनाथ | श्री. रामदास जोशी |
| २७. | श्री साईमाऊली | सौ. कलावती चव्हाण |
| २८. | पवित्र मरण | उज्ज्वल वा. कुलकर्णी |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



# श्री सा ई वा क्सु धा

गुरुपदीं सप्रेम भक्तियोग ।
हाच एक अनर्थोपशम मार्ग ।
महानाटकी साई श्रीरंग ।
भक्तां रंगवी निजरंगीं ॥ ३ ॥

आम्ही तयांस मानूं अवतारी ।
कारण लक्षणें तींच कीं सारीं ।
परी 'मी बंदा अल्लाचिया पदरीं'।
स्वयें येपरी वदत ते ॥ ४ ॥

जरी स्वयें अवतार ।
दावी पूर्ण लोकाचार ।
शुद्ध वर्णाश्रम-आचार ।
योग्य प्रचार चालवी ॥ ५ ॥

कधीं कोणाची बरोबरी ।
करी न करवी कवण्याही परी ।
पाही जो विश्वंभर चराचरीं ।
तयासीं हारींच साजिरी ॥ ६ ॥

न कोणाची अवगणना ।
कोणासही तुच्छ लेखीना ।
भूतमात्रीं नारायणा ।
चैतन्यघना पाही तो ॥ ७ ॥

—श्रीसाईसच्चरित्—अध्याय २३ वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५५ वे] जानेवारी ७७ [अंक १०

: संपादक :
श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६—०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४—बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३२ ६१

# संपादकीय —

**प्रिय श्रीसाईभक्तांनो,** सप्रेम नमस्कार वि. वि.

इंग्रजी कालगणनेप्रमाणे १९७७ साल आता सुरू झाले आहे. या सत्त्याहत्तर सालातला हा श्रीसाईलीलेचा पहिला अंक वाचकांच्या हाती देताना सहाजिकच नेहमी-प्रमाणे आम्हाला आनंद होत आहे. अनेक वाचकांची व भक्तांची श्रीसाईलीलेची वार्षिक वर्गणी जानेवारीपासून सुरू होते; यावरून आम्हास असे आता सांगावेसे वाटते की श्रीसाईलीलेचे वर्गणीदार आता वाढत्या संख्येने आहेत. ही संख्या आणखीन वाढावी यासाठी सतत प्रयत्न चालू आहेत. भक्तांनीही पण या कामी सहकार्य देऊन आमच्या प्रयत्नास हातभार लावावा ही विनंती. वाचकांना आवडेल, पटेल, रुचेल असाच श्रीबाबांच्या संबंधीचा मजकूर यापुढे प्रत्येक अंकातून दिला जाईल असे निश्चित आश्वासन आम्ही देतो.

श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांचा सप्त जन्मशताब्दी समारंभ सबंध महाराष्ट्रभर गेले वर्षभर अपूर्व उत्साहाने साजरा झाला व त्या निमित्याने ज्ञानेश्वरीची पारायणे अनेक ठिकाणी व अनेक तऱ्हेने झाली. व्यक्तिगत पारायणापासून सामुदायिफ पारायणापर्यंत; पारायण सप्ताहापासून अखंड पारायणापर्यंत ज्ञानेश्वरी पारायणाचे अनेक प्रकार या कालावधीत महाराष्ट्रात ठिकठिकाणी झाले. श्रीसंत ज्ञानोबारायांनी श्रीबाबांच्या प्रमाणेच जनतेला भक्तिमार्गाची ओळख करून दिली. त्यांचा ज्ञानेश्वरी ग्रंथ अमृताते पैजा जिंकणारा आहे हे सर्वमान्य आहे. म्हणूनच आज ज्ञानेश्वरी पठणाची पुण्याई सातशे वर्षानंतरही रतिभर सुद्धा कमी झालेली नाही. यंदाच्या वर्षी श्रीसंत गाडगेबाबांचा जन्मशताब्दी महोत्सव साजरा होत आहे व हा महोत्सव शासकीय पातळीवरून साजरा होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

आज विज्ञानाचे युग आहे आणि सर्वच बाबतीत तांत्रिक व यांत्रिकी प्रकरणांचे प्रस्थ माजलेले आहे. मानवी जीवन सुखाचे होण्यासाठी यंत्रयुगातील तंत्र सुधारणांचा उपयोग करून घेतलाच पाहिजे यात वाद नाही, पण यंत्रयुगाचा उदय म्हणजे अध्यात्मवादाचा अस्त, भक्तिमार्गाचा अंधार नव्हे. धर्म ही अफूची गोळी आहे असे कंठरवाने सांगणारे कम्युनिस्ट देश हलके हलके चर्चच्या पुनरुज्जीवनाकडे वळू लागले आहेत. भारतात केरळ हा प्रांत कम्युनिस्टांच्या छायेखालचा मानला जातो. पण कम्युनिझमच्या आहारी गेलेल्या प्रांतातदेखील देवपूजा मोठ्या प्रमाणात व भक्तिभावाने चाललेली दिसून येते. विश्वशांतीसाठी प्रचंड यज्ञ केरळमधील एर्नाक्युलम येथील

शिवमंदिरात गेल्या २९ नव्हेंबरपासून सुरू करण्यात आला व तो त्यानंतर पुढे चांगले वीस दिवस होता. त्याचे नाव 'कोटी अर्चनायज्ञ'. या यज्ञाच्या वीस दिवसांच्या कालावधीत शिवमूर्तीवर रोज पाच लक्ष फुले वाहाण्यात येत होती. गुलाब, जास्वंदी, कमलदले, तुलसी, बिल्वपत्रे यांच्या राशीच्या राशी या कामासाठी रोजच्या रोज यज्ञस्थळी—कोचीन येथे येऊन दाखल होत होत्या. सालेम, कोईमतूर, तिरुनावय इ. ठिकाणाहून ही फुले व पत्री रोजच्यारोज येऊन दाखल होत असे.

एवढ्या प्रचंड प्रमाणावर शिवलिंगावर असा फुलांचा पर्वतप्राय वर्षाव आतापर्यंत कधीच झालेला नव्हता, व तो कुणी पाहिला पण नव्हता. या यज्ञासाठी एक कोटी रुपयांवर खर्च करण्यात आला. पण हा यज्ञ कशासाठी चालला तुम्हाला ठाऊक आहे? सबंध भारतातील लोकांची भरभराट व्हावी आणि सर्व जगात शांति नांदावी म्हणूनच हा सारा खटाटोप होता. म्हणजे मानवी दुष्कृत्यांचे दुष्परिणाम निस्तरण्यासाठी माणूस शिवशक्तीला शरण जातो हेच खरे आहे असे म्हणावयास हवे. ● ● ●


# श्रीसाईलीला

## श्रीसाईकाव्य बहार विशेषांक


### मराठी साहित्यसृष्टीतील नाविन्यपूर्ण कल्पना

● श्रीसाईलीला हे अध्यात्मिक मासिक गेली ५५ वर्षे चालू आहे. या मासिकाचा फेब्रुवारी १९७७ चा अंक "श्रीसाईकाव्य बहार विशेषांक" म्हणून प्रकाशित होत आहे. या खास अंकात महाराष्ट्रातील अनेक साईभक्तांनी श्रीसाईबाबांवर रचलेल्या अनेक सुमधूर व भावपूर्ण कविता प्रसिद्ध केल्या जातील मराठी मासिक पत्रसृष्टीतून हा असा अंक साईभक्तांना संग्राह्य वाटेल यात संशय नाही. हा संपूर्ण अंक कवितांनीच गच्च भरलेला असेल. त्यात गद्य मजकूरास प्राधान्य दिले जाणार नाही. शिर्डीच्या श्रीसाईलीला लेखक—कवी तृतीय संमेलनात या आगळ्या खास अंकाचे प्रकाशन करण्यात येत आहे.

## परदेशात श्रीसाईबाबांचा प्रचार करणारे

# श्री. वसंतशास्त्री उर्फ आबा पणशीकर

—सदानंद चेंदवणकर
१२०/४०५५, टिळक नगर, चेंबुर, मुंबई–८९



श्री. वसंतशास्त्री उर्फ आबा पणशीकर

● शिरडीचे संत भगवान श्रीसाईबाबा महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर मशहूर आहेत. देशात त्यांची सुकिर्ती सर्वत्र आहे व त्यांचे विविध अनुभव आपल्या भक्तांना हरहमेशा येत असतात. पण आता परदेशातही श्रीसाईबाबा जाऊन पोचलेले आहेत व तिथेही बाबांच्या भक्तांची संख्या सारखी वाढत आहे. आता तर श्रीसाईबाबांचे एक छानसे मंदिरही ग्रेट ब्रिटनची राजधानी असलेल्या लंडन शहरी आहे. या देवळातल्या श्रीबाबांच्या मूर्तींची व पादुकांची स्थापना एका साईभक्ताने केली आहे. त्या भक्ताचे नाव आहे श्री. वसंतराव विष्णूपंत पणशीकर. श्री. पणशीकर परदेशात आता वसंतशास्त्री या नावाने परिचित असून आपल्या मित्रमंडळीत आबासाहेब या नावाने ओळखले जातात.

आबा पणशीकरांचे मूळ घराणे शास्त्री पंडितांचेच. त्यांचे आजोबा व वडील हे दोघेही शास्त्रीच. त्यांचे मूळ घराणें गोव्यातील. पेडणे येथे आबांचा जन्म २० मार्च १९२८ रोजी झाला. वयाच्या चौथ्या वर्षी ते आजोबा वासुदेवशास्त्री यांच्याबरोबर मुंबईस आले. त्यांचे आजोबा प्रसिद्ध पंचांग संशोधक शास्त्री होते व ते निर्णय सागरमध्ये २५ वर्षे शास्त्री विभागाचे प्रमुख होते. वडील विष्णूशास्त्री हे तर काशीला बारा वर्षे पठण करून मुंबईस निर्णयसागरमध्येच काम करीत. ते ठाकूरद्वारच्या काळाराम मंदिराचे पुजारी होते आणि म्हणूनच की काय लहानग्या आबांचे बालपण देवळातच गेले. आपल्याला मिळालेली कमाई इतरांसाठी उपयोगात आणावी व पुस्तके म्हणजेच संपत्ती हे बाळकडू त्यांना वडिलांकडून मिळाले.

तरुण आबांचे प्रा. शिक्षण ठाकुरद्वारच्या म्युनिसिपालटीचे शाळेत व दुय्यम मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण नवभारत नाईट हायस्कूलमधे झाले. परंतु शालेय शिक्षणापेक्षा कीर्तन, प्रवचन, पदयात्रा यांच्याकडे त्यांचा अधिक ओढा होता. गिरगावातील प्रसिध्द कीर्तनकार कै. ढोलेबुवा यांच्याकडे आबांनी कीर्तनाचे प्रारंभिक धडे घेतले. त्यासाठी पडेल ती कामे केली आणि वयाच्या बाराव्या वर्षापासून आबा कीर्तने करू लागले. १९४० साली मुंबईत झालेल्या कीर्तन संमेलनात औंधचे राजेसाहेब श्रीमंत भवानराव पंत प्रतिनिधी यांच्यासमोर आबांनी अगदी पहिले किर्तन केले. किर्तन–प्रवचनकारांना संस्कृतचा गाढा व्यासंग असणे अगदी जरूर असते म्हणून आबांनी नर्मदाशंकर व्यास या संस्कृत पंडितांकडे संस्कृत व्याकरणाचे पाठ घेतले. पुढे आबा मुंबईत श्रीसंत गाडगे महाराजांचे कार्यक्रमात सहभागी झाले. महाराजांनी संडास झाडण्याकरिता आबांचे हाती झाडू दिला व गाडगे बाबांच्या प्रभावामुळे आबांनी झाडू हाती घेतला. धर्मशास्त्रावर किर्तने केली. बाबांच्या समवेत खेडोपाडी हिंडून खरेखुरे समाजदर्शन घेतले. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी, हिंदु समाजात नष्ट करण्यासाठी झट-णाऱ्या पूज्य साने गुरुजींबरोबर काम करण्याची व त्यांच्या सहवासाची संधी त्यांना लाभली. गुरुजींच्या प्रत्येक भाषणातून कळकळ, तळमळ, समाजाबद्दलचे प्रेम जातियतेबद्दल तिरस्कार व्यक्त व्हायचा त्यामुळेच की काय आबा गुरुजींकडे आकर्षिले गेले. मूर्तिची पूजा म्हणजे देवाची पूजा नव्हे तर चालत्या बोलत्या माणसाची पूजा ही खरी पूजा या गुरुजींच्या वचनाचा त्यांचेवर चांगलाच प्रभाव पडला. आपल्या किर्तन प्रवचनाचे द्वारे त्यांनी गाडगे बाबा व साने गुरुजी यांच्या विचारांचा भरपूर प्रसार-प्रचार केला. ओघवती भाषा, तालसूरातील मधुर गायन, धर्मग्रंथांतील संदर्भाची फेक व सद्यपरिस्थि-तीशी मिळतं जुळतं असं त्यांचं किर्तन किंवा प्रवचन असत. संस्कृत मराठी व गुजराती या भाषांवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व आहे.

किर्तन-प्रवचने करीत असतानाच की काय श्री. पणशीकरांना भगवान श्रीसाई-बाबांच्या खऱ्या खुऱ्या कार्याची ओळख पटली व त्यांनी श्रीसाईबाबांच्या अकरा ठिकाणी पादुका स्थापन करण्याचा संकल्प सोडला. त्याप्रमाणे त्यांनी प्रथम २६ ऑक्टोबर १९५२ रोजी फणसवाडीतील प्रेमळ विठ्ठलमंदिरात साईबाबांच्या पादुकांची स्थापना केली. या मंदिराची व्यवस्था पणशीकर घराण्याकडे होती ती त्यांनी आपल्या स्वतःकडे घेतली. साईबाबांच्या दुसऱ्या पादुकांची त्यांनी अहमदाबादला खजुरी पोळमधे श्रीसाई-शरणानंद यांच्या मंदिरात स्थापना केली. श्रीसाईशरणानंद हे प्रत्यक्ष श्रीसाईबाबांना पाहिलेले भक्त आहेत, व आज त्यांचे वय ऐंशीच्या पुढे आहे. नंतर १९६४ साली डॉ. आर. टी. काकडे काचीगुडा हैद्राबाद येथे व १९७३ साली पुण्याला विनायक कुलकर्णी यांच्याकडे त्यांनी बाबांच्या पादुका स्थापन केल्या. पुढे १९६७ साली श्रीमती आजीबाई बनारसे यांच्या आमंत्रणावरून आबा लंडनला श्रीसाईबाबांच्या पादुका

घेऊन गेले व तिथे त्यांनी १९६८ साली पादुकांची स्थापना केली. आबा लंडन येथे राहिले. लंडनचे नागरिकत्व त्यांनी मिळविले व मराठी गुजरातीमधून त्यांनी अक्षरशः घरोघर किर्तने महाराष्ट्रीय कुटुंबामध्ये केली. लंडन येथे श्रीमती आजीबाईंची भारतातील बंधूसाठी म्हणून खाणावळ होती. आता ती नाही. तिथे आबांनी पडेल ते काम करून आजीबाईंच्या साईमंदिराची व्यवस्था पाहिली. त्यासाठी त्यांनी अनेक हाल-अपेष्टा पण सोसल्या. लंडन येथे आबांनी आपली भरपूर प्रगती श्रीसाई कृपेने केली. लंडन विश्वविदयालयाच्या पौर्वात्य व आफ्रिका भाषा विभागातील डॉ. ग्रे यांनी आबांचे संस्कृत उच्चार ऐकून त्यांना आपल्या विभागात संस्कृतचे अचूक उच्चार शिकविण्याचे काम दिले. याचवेळी ब्रिटिश लेबर पार्टीचे एक पदाधिकारी असलेले कै. अशोक कृष्णाजी ढमढेरे यांनी आबांना सर्वतोपरीने सहाय्य केले. ब्रिटिश सरकार व पोलीस यांचेकडून आबांना त्यांच्या केवळ पोषाखामुळे व वागण्यामुळे वेळोवेळी त्रास होई तो या ढमढेरेंच्यामुळे कमी झाला, इतकेच नव्हे तर एक हिंदु धर्मगुरु म्हणून ब्रिटिश सरकार व पोलीस त्यांच्याकडे पाहू लागले. ख्रिश्चन धर्मगुरुंना मिळणारा मान आबांना मिळू लागला.

ब्रिटनमध्ये गुजराती समाज फार मोठ्या संख्येने असून बहुतेक लोक सधन आहेत. त्यांच्यात धार्मिक वृत्ती फार. परंतु हिंदुधर्म विधीकरणासाठी लालस व पारंगत माणूस मिळणे कठीण. अशा वेळी मँचेस्टरच्या कृष्ण सेंटरचे प्रमुख श्री. चुनिलालभाई पटेल यांनी आबांना गुजराथी भाषा शिकविली व अगदी अल्पकाळातच आबांनी त्या भाषेवर प्रभुत्व मिळविले, व आज आबा गुजराथीत उत्कृष्ट प्रवचन करतात. आबांनी युरोपातील ३१ देशांतील अनेक मंदिरातून सप्ताह केले आहेत. रामायणावर धर्मजागृतीसाठी किर्तने केली आहेत.

स्वित्झर्लंडमधे थूर येथे स्वामी ओंकारानंद यांनी दिव्यप्रकाश केंद्र नावाची संस्था स्थापन केली असून तिथे स्वीस व जर्मन मुले हिंदुधर्माचे शिक्षण घेतात. हिंदुधर्मातील महान तत्वांनी प्रभावीत होऊन अनेक परकीय तरुणांनी हिंदुधर्माची दीक्षा तिथे घेतली असून ती दीक्षा देण्याचा दीक्षांत समारंभ आबा पणशीकरांच्या शुभहस्ते पार पडला होता. आज इंग्लंमधील गुजराती समाजाचे नेते श्री. बालमुकुंद पारेख यांनी तर आबासाहेबांचे तोंडभर कौतुक चालविले आहे. आज सत्यनारायणाची पूजा सांगण्यासाठी हॉलंड, बेल्जम, स्वीत्झलँड इत्यादी देशात आबा जातात. समतेचा पुरस्कार, जातिभेदावर प्रहार, मानवतेची पूजा आपल्या संस्काराचे संरक्षण, धर्माचा उचित अभिमान हा आबासाहेबांच्या सर्वच धार्मिक कार्याचा गाभा आहे. परदेशात आणि भारतात भागवत सप्ताह सातत्याने करण्याचे महान कार्य श्री. पणशीकरजी करीत आलेले आहेत. किर्तनातून ते आपले विचार परखडपणे व्यक्त करतात. आपल्या आकर्षक शैलीने श्रोतृवृंदास मंत्रमुग्ध करून टाकतात.

ढोंगीपणा, बुवाबाजी, अंधश्रद्धा, अज्ञान यांचा त्यांना तिटकारा आहे व ते सर्व नाहीसे होण्यासाठी आपल्या प्रवचन-किर्तनातून ते कडाडून टीका करतात. अध्यात्मिक विषय मांडीत असताना त्याकडे पाहण्याची व जगात वावरण्याची दृष्टी डोळस असावी. जात, धर्म पंथ, वगैरे भेदाभेद न मानता माणुसकीत परमेश्वर असल्याची त्यांची शिकवण मोठी प्रभावी व परिणामकारक असते.

१९५२ मध्ये फणसवाडीतील प्रेमळ विठ्ठल मंदिरात श्री साईबाबांच्या पादुका स्थापन केल्यापासून त्या देवाच्या भरभराटीस प्रारंभ झाला. मंदिरात २०–२५ विद्यार्थ्यांच्या राहण्याजेवणाची व त्यांच्या शिक्षणाची त्यांनी सोय केली. या कामी आबांच्या पत्नी सौ. इंदिराबाई यांनी विशेष कष्ट घेतले. माहेरहून मिळालेले ४० तोळे सोने या सार्वजनिक सेवाकार्यात त्यांनी कामी लावल. आबांच्या सर्व कार्यात त्यांनी बिनतक्रार हातभार लावला. चार मुले पदरात आहेत याचीही त्यांनी पर्वा केली नाही. १९५४ मध्ये त्यांनी दत्तमूर्तीची स्थापना केली. आपल्या प्रेमळ विठ्ठलमंदिराचा कारभार त्यांनी आपलेच एक विद्यार्थी श्री. पांडुरंग वारंग यांचेकडे सोपविला असून १९७७ साली या मंदिराचा रौप्यमहोत्सव साजरा करून अण्णासाहेब पुन्हा परदेशी जात आहेत. गेल्या वर्षी ते मुंबईत आले व तेव्हापासून तो प्रत्येक दिवशी त्यांची सार्वजनिक व आध्यात्मिक कार्याची घोडदौड सारखी चालूच आहे. बोर्डीला महात्मा फुले छात्रालय व जळगाव येथे साने गुरुजी वसतिगृह या दोन संस्थांचा संकल्प करून त्या त्यांनी आता कार्यवाहीत पण केल्या आहेत. तसेच गोव्यात डिचोलीजवळ पिळगाव येथे श्री साईमंदिरातून सप्ताह पण केले आहेत. श्रीसाईबाबांच्याकडे ते चमत्कारासाठी आकर्षित झाले नाहीत तर त्यांच्या समतेने भारावून गेले आहेत.

श्री. आबासाहेब पणशीकर यांच्या मातोश्रीचे नाव लक्ष्मीबाई ह्यांना एकंदर आठ अपत्ये झाली. त्यापैकी आबा हे क्रमांक दोनचे पुत्र. आबांना दोन बहिणी असून त्या शिक्षणशास्त्राशी संबंधित आहेत. 'नाट्यसंपदा' या महाराष्ट्रातील वैभवशाली नाट्यसंस्थेचे मालक–नट–दिग्दर्शक श्री. प्रभाकर पणशीकर हे आबांचे धाकटे बंधू होत. आबांचा विवाह १९४९ साली झाला. त्यांच्या पत्नी सौ. इंदिरा या परुळ्याच्या, पूर्वाश्रमीच्या कु. सुशिला बाळकृष्ण जोशी. त्यांना पुत्र–विनायक, विवेक व दोन कन्या वंदना व विद्या या आहेत. सध्या आबांनी पोटापाण्याचा व्यवसाय म्हणून लेस्टरला राज प्रिंटर्स नावाचा छापखाना चालविला असून तेथून 'सत्संग' नावाचे गुजराथी मासिक आबा चालवितात.

# युगावतार श्रीसाईबाबा – ७

(श्रीसाईबाबा सत्संग मंडळ, सुरत ह्यांच्या सौजन्याने)

अनुवादक : **श्री. चंद्रकांत दामोदर सामंत**
ताडदेव रोड, मुंबई–७

**मूर्तीचा हार जसाच्या तसाच**

● सत्पुरुषांना मरण नसते. पंचमहाभूतांनी घडविलेल्या मानवी देहाचा त्यांनी जरी कालांतराने त्याग केला तरी नंतरही आपल्या अस्तित्वाची प्रचिती निरनिराळ्या प्रकारे ते आपल्या भक्तांना वेळोवेळी आणून देत असतात. अशा प्रकारच्या अनुभवामुळेच भक्तांची ईश्वरावरील व संतपुरुषावरील श्रद्धा दृढ होत जाते. ह्या बाबतीतील भावनगर येथील एक गृहस्थ श्री. अनंतराय परिख ह्यांचा अनुभव उल्लेखनीय आहे.

श्री. परिख ह्यांची मुलगी रीटा ही एकदा एका भयंकर अपघातातून वाचल्यानंतर ते सर्व कुटुंबियासहीत १९६१ च्या एप्रिल महिन्यात शिरडीला गेले. तेथे त्यांनी श्रीबाबांची यथाविधी पूजाअर्चा केली व नंतर एका दुकानातून श्रीसाईनाथांची प्लास्टरची एक मूर्ती खरेदी केली. नेहमीच्या पद्धतिप्रमाणे ती मूर्ती श्रीबाबांच्या समाधीजवळ प्रसाद म्हणून ठेवण्यात आली. पूजा करणाऱ्या ब्राह्मणाने समाधीला अर्पण केलेला एक छोटासा हार उचलून मूर्तीला चढविला. श्री. परिख ह्यांनी त्या हारासकट मूर्तीचे पॅकिंग करण्यास दुकानदारास सांगितले. नंतर सर्वजण मुंबईला गेले. तेथे ते आठएक दिवस राहिले. भावनगरला परतल्यानंतर त्यांनी मूर्तीचे पॅकिंग हळुवारपणे उघडले, आणि काय आश्चर्य ! जवळजवळ दहाबारा दिवसांपूर्वी मूर्तीला चढविलेला हार जसाच्या तसा ताजा टवटवीत होता. एप्रिल महिन्यातील शिरडी येथील कडक उन्हाळ्याचा हारावर काहीएक परिणाम झालेला दिसत नव्हता. ह्या प्रसंगावरून श्री. परिख ह्यांना श्रीसाईबाबांच्या निरंतर अस्तित्वाची खात्री पटली. ● ● ●

● अहमदाबाद येथे तारकस भुवनात राहणाऱ्या श्री. रतीलाल चिमणलाल शेठ ह्यांनी श्रीसाईबाबांना श्रीशंकरस्वरूप समजून सव्वालक्ष बिल्वपत्रे वाहण्याचा संकल्प सोडला होता. संकल्पपूर्तीच्या नंतर येणाऱ्या प्रथम गुरुवारी सर्व भक्तमंडळींना बिल्वपत्रधारी श्रीबाबांचे दर्शन घडले. सर्व विधी यथासांग पार पडल्यानंतर एके दिवशी सकाळी ती समुद्रात विसर्जित करण्याच्या हेतूने श्री. रतिलाल ह्यांनी देवघराच्या खोलीचे दार उघडले, तो त्यांना त्या बिल्वपत्रांच्या ढिगाऱ्यासमोर एक नाग फणा उभारलेल्या अवस्थेत दिसला. त्या नागाने प्रथम त्या बिल्वपत्राच्या ढिगाऱ्याला एक प्रदक्षिणा

घातली व तसाच तो श्रीबाबांच्या फोटोकडे गेला आणि तेथेच असलेल्या राधा व श्रीकृष्णाच्या तसबिरीवर फणा उभारून स्तब्ध राहिला. हा प्रकार पाहताच श्री. रतीलाल ह्यांनी घाबरूनच दरवाजा त्वरेने लावून घेतला व बिल्वपत्रे विसर्जित करण्याचा बेत तात्पुरता स्थगित केला. साधारणपणे दोनएक तासानंतर बाहेरगावची काही मंडळी श्री बाबांच्या दर्शनाला तेथे आली. त्यांना बरोबर घेऊन श्री. रतीलाल देवघरात गेले. पण तेथे त्यांना सकाळचा नाग दिसला नाही. आपल्याला श्री साईनाथांनी शेषशाई भगवानाच्या स्वरूपात सकाळी दर्शन दिले ह्याविषयी त्यांची पक्की खात्री झाली. त्यांच्या शिवभक्तीने प्रसन्न होऊन श्री भगवान विष्णुनारायणांनी हरिहर एकत्वाचे महत्त्व त्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी व बाहेरगावाहून येणाऱ्या भक्तांना बिल्वपत्रधारी श्रीबाबांचे दर्शन घडविण्यासाठीच बिल्वपत्रांचे विसर्जन लांबणीवर टाकून हा बनाव घडवून आणला नसेल कशावरून ?


# ‘अक्कलकोट स्वामी दर्शन’ त्रैमासिक प्रकाशित होणार

दत्तअवतारी अक्कलकोट स्वामी सेवेसाठी **‘अक्कलकोट स्वामी दर्शन’** त्रैमासिक दत्तजयंती ६–१२–७६ ला सुरू करण्याचे ठरविले आहे. दत्तजयंतीस पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. या मासिकाचे वर्षातून (१) **दत्तजयंती** (२) **अक्कलकोटस्वामी पुण्यतिथी** (३) **गुरूपौर्णिमा** (४) **दसरा–दिवाळी** असे चार अंक निघतील. कोणासही स्वामी सेवेचे लेख–काव्य, दृष्टांत, दत्तभक्तीपर लेख, अध्यात्मिक साहित्य, संत चरित्रे लिहून पाठविता येतील. सर्व स्वामी–दत्त मठ व्यवस्थापकांनी झालेले व भावी कार्यक्रम कळवावे. सध्या सवलत म्हणून वार्षिक वर्गणी १० रुपये मनी ऑर्डरने पाठविता येईल. ठेव, देणगी, कोणतेही सहाय्य करता येईल.

**कोणत्याही माहितीसाठी लिहा —**

**संपादक** — ‘अक्कलकोट स्वामी दर्शन’ ७८६, कसबा पेठ, पुणे – ११.

# श्रीसाईबाबांची भक्ति

— श्री. मुरलीधर घोलप
६५३, सहकार नगर नं. २, चेंबूर ७१.

● होमिओपाथि औषधाचा असा एक गुण आहे की त्या औषधाच्या गोळीचा एक कण जरी घेतला किंवा औषधाचा फक्त वास जरी घेतला तरी सुद्धा औषध शरिरात ताबडतोब भिनते व त्या औषधाचा योग्य तो परिणाम जादूसारखा दिसू लागतो. श्रीसाईबाबांच्या भक्तीचा सुद्धा असाच परिणाम ताबडतोब प्रत्ययास येतो. मात्र श्रीबाबांची भक्ति करताना ती मनापासून हवी, अंतःकरणापासून हवी, पोटातून हवी, ओठातून नको. श्री बाबा हे प्रेमळ व निर्भेळ भक्तीचे भुकेले आहेत. त्यांची मनापासून भक्ति करणाराना ते संकटकाळी कोणत्या ना कोणत्या रूपाने मदतीस सत्वर धाऊन येतात. सूर्यापासून निघालेले प्रकाशकिरण ज्या वेगाने हवेतून प्रवास करतात तितक्याच वेगाने एखाद्या लहानशा दिव्यापासून निघालेली प्रकाशाची तिरिपसुद्धा हवेतून जाते. म्हणजे प्रकाशकिरण मोटा असो छोटा असो, दोघांचा वेग सर्वसाधारण म्हणजे एकच आहे. तद्वतच श्री बाबांची भक्ती करताना त्यांच्या प्रतिमेची फूलहार, सुगंधी उदबत्ती अशी सर्वांगी पूजा केली काय किंवा त्यांचे नुसते नामोच्चरण केले काय परिणाम एकच व तो म्हणजे श्री बाबा आपल्या पाठीमागे संकटकाळी आधार म्हणून उभे रहातात. पोटातील भुकेचा वडवानल हा मीठभाकरी खाऊनही शांत होतो आणि लाडू जिलेबी खाऊनही शांत होतो. तेथे भेदाभेद नसतो. तसेच श्री बाबांची भक्ति जरी श्रीमंती थाटात पण अंतःकरणापासून केली आणि एखाद्या गरिबाला श्री बाबांचा फोटो घेण्याची सुद्धा ऐपत नसेल पण त्याने श्री बाबांचे मनापासून भजन केले आणि डोळ्यासमोर श्री बाबांची मूर्ति आणली तरीसुद्धा दोघानाही श्री बाबा पावतात व संकटकाळी मदतीचा हात पुढे करतात. मनापासून केलेल्या श्री बाबांच्या भक्तीचा परिणाम त्वरित दिसून येतो, कारण श्री बाबा हे अवतारी पुरुष आहेत. अंतरज्ञानी पुरुष—श्रेष्ठ आहेत. ते शरिराने जरी आज जगात नसले तरी अदृश्य रूपाने ठिकठिकाणी ते भ्रमण करत असतात. त्यांच्या भक्ताना ते कोणत्या ना कोणत्या रूपाने मदत करतात. संकटकाळी ते दत्त म्हणून एकदम पुढे उभे राहातात व योग्य ते मार्गदर्शन करतात, हा तर कैक जणांचा अनुभव आहे. अगदी ध्यानी मनी नसताना ते कोठून तरी कोणत्या तरी रूपाने अवतरतात आणि मदतीचा हात पुढे करतात, दिलासा देतात व त्यांच्या भक्ताला संकटातून तारून नेतात. कथिलाचा लहानसा तुकडा हा अनेक भांड्यांना झगझगीत करून सोडतो. त्या भांड्याचा अंतःर्भाग लखलखीत होतो. श्री बाबांच्या भक्तिमुळे सुद्धा अनेक भक्तांची अंतःकरणेसुद्धा अशीच लख्ख होतात, निर्मळ बनतात. त्यांचा काया-

पालटच होतो. श्रीबाबाना त्यांची मनापासून केलेली भक्ति समजते, आवडतेही, कारण ते परमेश्वरी अंश असलेले पुरुषोत्तम होते. श्रीबाबा हे काही जादुगार किंवा किमया करणारे नव्हेत, पण त्यांच्या भक्तीने मात्र जादुसारखी किमया दिसून येते हे मात्र खरे आहे. त्यांनी पाणी ओतून पणत्या पेटवून दाखवल्या म्हणजेच त्यांच्या अंगी एक अद्भूत प्रचंड शक्ति होती, ते परमपदी पोहोचलेले पुरुष होते. श्रीबाबांच्या फोटोमधील प्रतिमेकडे बघितले तरी असे वाटते की, ते डोळ्यांनी आपल्याशी बोलताहेत. फोटोतील त्यांची समईतल्या ज्योतिसारखी शांत व स्निग्ध नजर आपल्याला खरोखरीच दिलासा देते. श्रीबाबांचे सतत ध्यान केले, अखंड निद्ध्यास केला तर मन त्यांचेशी तादात्म्य पावते व मग जी अखंड आनंदमय, चैतन्यमय स्थिती निर्माण होते त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊ शकतो व मनाला जो आनंद प्राप्त होतो त्याला पारावार नाही. त्या आनंदाच्या भरात मग जे काही कृत्य आपले हातून घडते ते श्रीसाईंच्या चरणाशी अर्पण होते. म्हणजेच ते काम आपले हातून सहजगत्या होते. मी केले अशी भावनाच आपल्यात रहात नाही. आपण मग सहजानंदाअवस्थेत चिरकाल टिकून रहातो. आपला अहंभाव नाहीसा होऊन एक सत्त्व आपल्यात ओतप्रोत भरून राहाते, तसा निदान आपल्या मनाला साक्षात्कार होतो. मन श्रीसाईमय होऊन जाते, सर्व श्रीसाईमय दिसू लागते. मन आनंदमय होऊन जाते. आपण ब्रह्मानंदात डुंबू लागतो.

असा हा निरामय भक्तीचा अगाध परिणाम आहे. त्याचा अनुभव आपली भक्ति मनापासून व श्रद्धेची असेल तरच आपण घेऊ शकतो. श्रीबाबांना माझे कोटी कोटी साष्टांग नमस्कार. ● ● ●

# दीपज्योती नमोस्तुते

— विनायक पाठक
बी, १७/२३४, राजावाडी,
घाटकोपर, मुंबई-७७.

● दिवा म्हणजे प्रकाश देणारा. काळोखात मार्गदर्शन करणारा. दिव्याचे कार्य सतत जळत राहणे व दुसऱ्याला उजेड दाखविणे. दिवा म्हणजे स्वतः झिजून दुसऱ्याला सुवास देणाऱ्या चंदनाच्याच जातीचा. स्वतःच्या आत्मदहनातून जगाला ज्योतिर्मय करणारा उपकारी. जगाच्या कल्याणा असणाऱ्या संतांच्या विभूतीच्या जातीतला महान परोपकारी !

पणती, समई, कंदील, बेडलॅंप, कणकेचे दिवे, इलेक्ट्रीक बल्ब, बॅटरी, ट्यूब, मर्क्यूरी लॅंप हे सर्व प्रकार वास्तविक दिव्याचेच ! पण आकार, प्रकार, सौष्ठव, प्रकाश

देण्याची क्षमता, किंमत, उपयुक्तता आणि सोय या नानाविध तपशीलभिन्नतेमुळे दिव्याच्या अनेक पोटजाती पडल्या आहेत.

पणती कंदीलापासून तर झगमग प्रकाश देणाऱ्या मर्क्युरी लाईटपर्यंत ह्या दिव्यांच्या सुधारणांचा व संशोधित आवृत्यांचा म्हणजेच वैज्ञानिक प्रगतीचा इतिहास आहे.

धार्मिक कार्यात समई लागते. दिवाळीचे वेळी ओवाळताना पाटाभोवती चार कणकेच्या दिव्यात वात लावून ती जळत ठेवायाची प्रथा आहे. ओवाळताना निरांजन ठेवतात तोही दिव्याचाच प्रकार. लग्नसमारंभाचे वेळी (विशेषतः वरातीचे वेळी) आजच्या विजेच्या युगातही मागून पुढून गॅसबत्त्या डोक्यावर घेऊन चाललेल्या बाया अथवा पुरुष आपणास दिसतात.

या दिव्यावरूनच "दिवा जळू दे सारी रात" हे नाटक मराठी रंगभूमीवर आले तसेच 'दिव्याखाली अंधार' ही म्हणही मराठी साहित्यात रूढ झाली.

तसे पाहिले तर दिवा हा सूर्याचाच अवतार आहे. कमी जास्त प्रकाश देण्यातील क्षमतेत अथवा प्रखरतेच्या तपशीलात काय फरक असेल तेवढाच !

दिवे लागणीला घर उघडे ठेवावे, देवासमोर दिवा लावावा व ईश्वरापुढे हात जोडून आमच्या जीवनात सदैव प्रकाश राहू दे ही प्रार्थना करण्याची सनातन प्रथा आहे. दिवे लागणीच्या वेळी लक्ष्मी घरात येते असाही आपला एक संकेत प्रचलित आहे.

दिवा लावणे हा जसा सत्कर्माचा भाग आहे, तसेच "दिवे लावणे" हे उपरोधाने दुष्कृत्य सूचित करणारे आहे. "ह्यांच्या चिरंजिवानी ना आपल्या आयुष्यात चांगलेच (!) दिवे लावलेत" हे सात्विक व संतापजनक उद्‌गार आपण अनेक वेळा ऐकतो —

दिवा म्हणजे प्रकाश याचा अध्यात्मात ज्ञान असाही अर्थ होतो. माणसाच्या हृदयात अध्यात्माचा दिवा लागला म्हणजे त्याला भौतिक गोष्टीबद्दल अनासक्ती वाटू लागते. ज्ञानदीप हा भौतिकाकडून अध्यात्माकडे व स्थूलापासून सूक्ष्माकडे नेणारा आहे.

दिव्यापासूनच दिवाळी–दिव्यांच्या ओळी–दीपावली हा शब्द रूढ झाला.

अंथरुणाशेजारचा दिवा मालवा म्हणजे बाहेर किती उजाडले याचे आपोआप ज्ञान होईल. अहंकाराच्या टिमटिमत्या उजेडापुढे दैदिप्यमान सूर्याचे तेज किती प्रगल्भ व दिव्य आहे याचे प्रत्यंतर आल्याखेरीज राहत नाही हा यातील गर्भितार्थ !

लहानपणी आपल्या वाडवडिलांनी दिलेली 'शुभ करोति कल्याणम्। आरोग्यम् सुख संपदाम्। शत्रुबुद्धि विनाशाय। दीपज्योति नमस्तुते ॥ ही प्रार्थना अजूनही पुष्कळाना स्मरत असेल.

"दिव्या दिव्या दीपककार। कानी कुंडली मोतीहार। दिव्याला पाहून नमस्कार" हा श्लोक म्हणून रोज दिव्याला नमस्कार करण्याचा शुभ संकेत आपल्या पूर्वजानी

आपल्या ऐश्वर्यासाठी, मानसिक स्वास्थ्यासाठी व पर्यायाने अध्यात्माची अप्रत्यक्ष गोडी लावण्यासाठी पाडून ठेवला असावा.

ज्ञानाला आपण दीपाची उपमा देतो. " ज्ञानदीप उजळु दे "– म्हणजेच ज्ञानाचा दिवा लावल्यावर तम म्हणजे अंधाराचा नाश होईल–तामसी वृत्तीना पायबंद बसेल. लाक्षणिक अर्थाने दिवा म्हणजे प्राणज्योत ! माणसाची प्राणज्योत मालवली म्हणजे त्याच्या निधनानंतर त्या जागी दहा दिवस दिवा तेवत ठेवण्याची पद्धत आहे. हा दिवाच जणू मृतात्म्याला सद्गतीचा मार्ग दाखविण्यासाठी तेवत ठेवतात हाही, गर्भितार्थ असू शकेल.

विजेच्या दिव्यांमुळे २६ जानेवारी सारख्या राष्ट्रीय महोत्सवात, मोठ्या मोठ्या लग्नसमारंभात आपण दिव्याची रोषणाई पाहतो. नेत्रदीपक दिव्यांच्या लखलखाटात माणसाचे ऐश्वर्य व उत्कट आनंदाचे उधाण साकार झाल्याचा साक्षात्कारच होतो व म्हणूनच आपण म्हणतो– " दीपज्योति नमोस्तुते ! " ●

# बाबांनी प्रसाद दिला

— कु. शालिनी देशपांडे
११, रामदास कॉलनी, जळगाव.

● शिर्डीचे श्री सच्चिदानंद सद्गुरु साईबाबा म्हणजे खरोखर भक्तांसाठी या भूलोकात अवतरलेला साक्षात् परमेश्वर. बाबा समाधिस्त झालेले असले तरी ते कोणत्याना कोणत्या रूपाने आपल्या भक्तांना आशेचा किरण दाखवित असतात. संकट काळात सहारा देत असतात. त्याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे आम्हा सर्व कुटुंबियांना आलेला अनुभव.

२१ मार्च १९७५ चा तो दिवस होता. त्या आधी आई अचानक खूप आजारी झाल्याने आम्ही तिला शिर्डीला दर्शनास आणू असा नवस केला होता; व तो फेडण्यासाठी म्हणून २१ मार्चला मी, आई, वडील व छोटी बहिण असे चौघेजण शिरडीस गेलो होतो. तेथे पोहोचताच प्रथम धूळ भेट घेण्यासाठी म्हणून आम्ही फुले आरती घेऊन समाधी दर्शनास गेलो.

ती वेळ साधारणपणे दुपारी चार ते साडेचारची असल्याने मंदिरात गर्दी अजिबात नव्हती. म्हणून आम्हास अगदी निश्चितीने दर्शन घेण्याचा अलभ्य लाभ घडला. व आम्ही बराच वेळ तेथे बसलो. नंतर दुसरी ठिकाणे बघण्यासाठी म्हणून आम्ही हात लांब करून नमस्कार करू शकतो त्या ठिकाणी मी तशाप्रकारे नमस्कार करीत असताना बाजूला आई-वडीलाशिवाय दुसरे कोणीच नव्हते. समाधी स्थानाची जागा अगदी स्वच्छ होती, तेथे कोठेही काहीही पडलेले नव्हते. अशी परिस्थिती असताना

माझ्या टेकलेल्या हाताजवळ अचानक एक खोबऱ्याचा तुकडा मला सापडला. ते पाहून सर्वांनाच एकदम आश्चर्य वाटले. तेथे आम्ही सोडून दुसरे कोणीच नसताना व तेथील पुजारीसुद्धा आपल्या कामात गुंग असताना आपणास प्रसाद कसा मिळाला याचे सर्वांना आश्चर्य वाटू लागले. परंतु लगेच आमच्या लक्षात आले, दुसरे कोणी नसेल, तरी बाबा तेथे नाहीत का ? म्हणजे **बाबांनीच आपणास हा प्रसाद दिला,** अशी खात्री होऊन आम्ही अतिशय आनंदाने तो प्रसाद भक्षण केला.

नंतर तेथून मंदिरातील एक एक भाग पाहाण्याच्या उत्कंठेने आम्ही तेथून निघालो. नंतर एक एक ठिकाण पाहात आम्ही बाबांच्या नियम्ति वापरावयाच्या वस्तू ( चिलमी, जोडे, जाते ) ठेवलेल्या ठिकाणी आलो. ते पहात असताना काही प्रथमच शिर्डीस आलेले लोक तेथे आले. त्यांनी वडिलांना कोठे काय पाहाण्यासारखे आहे वगैरे विचारले, वडिलांनी त्यांना सर्व माहिती सांगितली. नंतर आता आपण आपल्या मुक्कामावर जाऊ अशा विचाराने आम्ही तेथून निघालो. आणि काय आश्चर्य ! वडिलांनी मागे फिरून एक पाऊल टाकताच एवढ्या गर्दीत त्यांना त्यांचे पायाशी एक रुपया पडलेला आढळला. त्यांनी तो उचलला तर लगेच पुढच्या पावलाजवळ एक रुपया असे लागोपाठ तीन रुपये सापडले. यातील आश्चर्याची गोष्ट म्हणजे एवढ्या गर्दीत ते तीन रुपये तेथे राहिले कसे ? कोणाचेच लक्ष त्याकडे कसे गेले नाही ? ही बाबांचीच लीला म्हणावी ना ?

बाबांनी प्रसाद म्हणूनच तीन रुपये आम्हास दिले हे निश्चितच. त्यामुळे ते तीन रुपये आम्ही जपून ठेवले आहेत. व ते तसेच ठेवण्याचेही ठरविले आहे. तो बाबांकडून मिळालेला अमोल ठेवाच आम्ही समजतो.

सर्व साक्षात्कारी श्री सच्चिदानंद बाबांना काय अशक्य आहे ? ते कोणत्याही रुपात आपल्या भक्ताला भेटू शकतात. आपल्या लेकराला मायेचा ऊब देऊ शकतात किंवा कोणत्याही रुपाने प्रसाद देऊन लेकराचे अंतःकरण प्रसन्न करू शकतात. यासाठी बाबाबद्दल अलोट निष्ठा असली पाहिजे. तन-मन-धन अर्पण करून बाबांची सेवा (नुसते नामस्मरण ) केल्यास बाबांच्या अवर्णनीय लीलांची आपणास निश्चितच प्रचीती. येते. कोणत्याही मनोकामना पूर्ण होऊ शकतात कारण बाबांनी म्हटलेच आहे कीं,—

जो जो मज भजे जैशा भावे ।
तैसा तैसा पावे मी हो त्यासी ।

अशा प्रकारे अनेक लहान मोठे अनुभव आम्हास आल्याने आमच्या घरातील लहान मोठे सर्वच श्री साईबाबांचे भक्त झाले आहेत.

अनंत कोटी ब्रह्मांड नायक, ॐ राजाधीराज योगीराज
परम ब्रह्म श्रीमत श्री सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथ चरणी समर्पण.

# अनुभवाने श्रीसाईभक्त झालो

**श्री. बाळकृष्ण कुळकर्णी,**
इखे बिल्डिंग, पं. दीनदयाळ मार्ग, डोंबिवली.

● मी राहणार नाशिक येथील. जन्म सन. १९०८ शिक्षण मॅट्रीकपर्यंत मॅट्रीक सन १९२६ साली झालो. १९३२ साली नाशीक येथेच इरिगेशन खात्यामध्ये सरकारी नोकरीस लागलो. नाशिक येथे मी पंचवटीत श्री शंकराचार्य (शृंगेरी) मठात जन्मापासून सन १९३३ पर्यंत रहात होतो. शंकराचार्य मठात रोज पुराण होई मठात साधु संन्यासी उतरण्यास येत. त्यात काही विद्वान, देवभक्त, अत्यंत वंदनीय असत. श्रीकाळाराम मंदिर जवळच आहे. मठात व काळाराम मंदिरात कीर्तने प्रवचने होत. ह्या धार्मिक वातावरणाने मीही लहानपणापासून देवधर्माकडे लागलो. माझे लहानपणी मी रहात असलेल्या मठात औदुंबर झाड होते त्या खाली श्री दत्त मूर्ती स्थापना झाली. छोटेसे देऊळ बांधले. ह्या दत्तमूर्तीचा माझे मनावर परिणाम होऊन मी श्री दत्त भक्त बनलो. लहानपणापासूनच मी रोज संध्या, बृहत्स्तोत्र रत्नाकरातील स्तोत्रे व रात्री मठातच १ तासभर भजन करीत असे. मी श्री गुरु दत्ताकडे आकर्षित झालेवर श्री दत्त भक्ती सर्वात श्रेष्ठ असे मानू लागलो. पुढे पुढे तर गुरुभक्ती शिवाय इतर काहींच करीत नसे.

सन १९४१ मध्ये माझी रहाता ता. कोपरगाव येथे इरिगेशन सब्‌डिव्हिजन मध्ये स्टोअर क्लार्क म्हणून बदली झाली. माझेकडे सोपविलेले कामात एक काम रहाता येथे आफीसमध्ये जमा झालेले सरकारी पैसे कोपरगाव येथे सरकारी खजीना (मामलेदार कचेरी) येथे जाऊन भरणे व आमचे ऑफीसर इंजीनीयर याना वेळोवेळीं खर्चास लागणारे पैसे तेथून आणणे हे होते. या कामाकरिता कोपरगावी महिन्यातून तीन चार वेळा जावे लागे. त्यावेळी एस्. टी. नव्हती. खाजगी मोटार वहाने होती पण त्यात खूप गर्दी असे. त्यावेळी दुसरे महायुद्ध चालू होते. प्रवासाचा खूपच त्रास असे. लोक पुष्कळ वेळी मोटारचे टपावरसुद्धा बसत व प्रवास करीत. अशा गर्दीमध्ये माझे पैसे आणणे-नेणेचे काम जोखमीचे वाटे. त्यामुळे मी शक्यतो सायकलवरूनच जातयेत असे व हे काम करीत असे. रहाता–कोपरगाव अंतर १० मैल आहे. सायकलवरून जाणेस १ तास व येणेस १ तास अजमासे लागे. जाणे येणेचा रस्ता श्री क्षेत्र शिर्डीवरून आहे. मी त्यावेळी तरुणच असल्यामुळे मला ह्या काही त्रास भासत नसे. प्रथम प्रथम मी जाते येतेवेळी शिर्डीवरून जाताना किंवा परत येताना मंदीरात जाऊन श्रीसाईदर्शन घेत नसे. तसाच जात येत असे. कारण मी दत्तभक्ती करतो मला दुसरे देव अगर गुरूंची भक्ती करणेची जरूर काय ? अशा भावनेने मी दर्शन घेत नसे.

असे माझे ५–६ महिने रहाता–कोपरगाव प्रवास होई. मी वर सांगितलेप्रमाणे मुळीच शिर्डी येथे उतरत नसे. त्यानंतर श्रीसाईने मला अद्दल घडविणेचे ठरविले असावे. बिकट प्रसंग उभा केला. त्यांचे कृपेने प्रसंगातून निभावलो व पुढे दर खेपेस शिर्डी येथे उतरून मंदिरास जात जाऊन श्री साईचरणी वंदन करू लागलोव श्रीसाईमय बनलो. तो प्रसंग व अनुभव असा एकदा मला आमचे इरिगेजन ऑफीसमध्ये जमा झालेले अजमासे ६०० ते ७०० रुपये कोपरगाव येथे सरकारी खजिन्यामध्ये भरणे करणेचे व त्याचवेळी परत येतेवेळी खजिन्यातून खर्चाकरता अजमासे १२००-१३०० रुपये आणणेचे काम आले. अशा प्रसंगी मी भरणा करणेची रक्कम बरोबर न घेता खर्चाकरता आणणेचे रकमेतून भरणा करून म्हणजे बनावट करून उरलेली रक्कम परत आणीत असे, व हे सोईचे वाटे. त्याही वेळी खर्चास लागणारे रुपये १२०० ते १३०० त्यामधून जमा करणेची रक्कम रु. ६०० ते ७०० कापून घेऊन राहिलेले पैसे ट्रेझरी कारकूनास देणेस सांगितले. ट्रेझरी कारकून व मी सरकारी कामाचीच माणसे असल्यामुळे एक-मेकावर भरवसा ठेवीत असू. खर्चास लागणारे रकमेमधून भरणा करणेची रक्कम वजा करणेचे वेळी वजावटीत शतकाचा :हातचा धरावयास नको तेथे तो धरला. त्यावेळी कचेरीत भरणा व पैसे घेणेची खूप गर्दी होती त्यामुळे गडबडीत आमचे दोघांचेही चूक लक्षात आली नाही. गडबडीमध्ये ट्रेझरी कारकूनास देणेघेणेची व मला परत लवकर जाणेची गडबड झाली व हिशेब चुकला. ह्या चुकीमुळे मी रहाता येथे रु. १०० कमी घेऊन आलो, व तितके पैसे खजिन्यात वाढले रु. १०० कमी आले ही गोष्ट रहाता येथे ऑफीसमध्ये पैसे मोजून देतेवेळी लक्षात आली. त्यावेळी माझा पगार रु. ४० होता

महागाई वगैरे काही नव्हती. रुपये शंभर ही रक्कम मोठी वाटत होती. पैसे भरावे लागणार. आपल्या पगारातून ही रक्कम भरून आपण प्रपंच रक्कम पूर्ण फेडी-पर्यंत कसा भागविणार ह्या विषयी चिंतेने मी अगदी घाबरून गेलो. मी रहाता येथे पोचलो, त्यावेळी साडेपाच वाजले होते. लगेच म्हणजे तासाभरात मी परत सायकलवर कोपरगावी १०० रु. रकमेच्या तपासाकरता निघालो. त्यावेळी मात्र मी शिर्डी येथे उतरलो. मंदीरात गेलो. श्रीसाई दर्शन घेतले. श्रीसाई बाबांची करुणा भाकली. प्रार्थना केली. आपणास दत्तावतार म्हणतात. माझी ह्या संकट प्रसंगातून मुक्तता करावी मी श्री दत्तगुरू बरोबर आपलीही भक्ती करीत जाईन. आतापर्यंत मी अज्ञान म्हणून माझ्याकडून चूक झाली क्षमा करावी अशी आठवण करून उदी कपाळास लावून मी कोपरगावास निघालो व तिथे ७ च्या सुमारास पोचलो. कचेरी बंद झाली होती. तेथून ट्रेझरी कारकूनाचे घरी गेलो व त्यास झालेली चूक सांगितली. त्यावेळी मला घाबरू नका आमचे तिजोरीत तुमचे शंभर रुपये वाढलेले आहेत. आपण कच्च्या वहीवर मी बेरीज वजाबाकी (खर्चाची घेण्याची रक्कम व भरणा करण्याची रक्कम) केली त्यावरून ही चूक समजली आहे. असे सांगितले मग आम्ही दोघे मुख्य ट्रेझरी ऑफीसर मामलेदार साहेब यांचेकडे गेलो. त्यांस ही सर्व हकीकत माहिती होतीच. त्यांनी मला त्यांचे जवळील

रु. १०० देऊन मला माझ्या अडचणीतून सोडविले पैसे हातात मिळाल्यावर माझा जीव भांड्यात पडला. हे सर्व झाल्यावर मनातल्या मनात कोपरगाव येथेच श्री साईचरणी नमस्कार केला. परत रहाता येथे येण्यास निघालो. ह्यावेळी रात्रीचे आठ वाजून गेले होते. सायकलवरून ३–४ मैलावर आल्यावर सायकलचे मागचे चाक पंक्चर होऊन हवा जात असलेली दिसली. पुन्हा हे काय संकट म्हणून घाबरलो. अंधार पडलेला. जवळ-जवळ वर्दळ वाहतूक नाहीच. सभोवती जंगल व साखर कारखान्याचे ऊस मळे. भयानक प्रसंग होता. आठवण झाली की अजूनही प्रसंगाची भयानकता वाटते. जवळ शंभर रुपये मोठ्या संकटातून निभावून मिळालेले. सायकलवरून उतरलो. श्रीसाईबाबांची मनासमोर मूर्ति उभी करून करुणा मनोमन भाकली. प्रार्थना केली. सचिंत उभा राहिलो. तो समोरून कोपरगावकडे जाणारा एक मनुष्य सायकलवरून जात असलेला दिसला. त्यास हाक मारली. हवा भरण्याचा पंप आहे काय विचारले. श्रीसाईकृपेने त्याच्याजवळ पंप होता. पंक्चर असलेल्या चाकास तशीच हवा भरली व श्रीसाईबाबांचे नाव घेतले व दडपून निघालो. आश्चर्य हे की काही त्रास झाला नाही. शिर्डी येथे आलो. तेथे आमचे ओव्हरसीयर ऑफिस आहे. त्यामधून दुसरी सायकल घेतली. रहाता येथे पैसे मिळाल्याबद्दल फोन केला. मी लवकरच येतो हे कळविले. नंतर मी श्री साई मंदीरात गेलो. श्रीसाई दर्शन घेतले. नारळ फोडले. हजर असलेल्याना प्रसाद वाटला. आश्चर्य वाटले ते की वाटेत रात्री पंप हवा भरण्याचा मनुष्य श्रीसाई कृपेने आला, व संकट दूर झाले. नाहीतर मला हातात सायकल धरून पायीच यावे लागले असते. ह्यावेळी मनास टळल्यामुळे हलके वाटत होते. पुनः पुनः श्रीसाई तसबीरांचे दर्शन घेतले. पादुकांचेवर कपाळ घासून घेतले, व ह्यापुढे आपली भक्ती करीत जाईन असे सांगितले. उदी कपाळास लावली. पुढे मी रहाता येथे आलो. इंजीनीयर साहेब यांचेकडे पैसे दिले. तेही मोटारमधून येऊन ऑफीस तिजोरीत पैसे ठेवून त्या दिवशीचे कॅशबुक पुरे केले.

ह्या वेळेपासून श्रीसाई बाबाची भक्ती करू लागलो. दर गुरुवारी व विशेष उत्सव समारंभ प्रसंगी श्रीसाई बाबांचे दर्शनास शिर्डी येथे जाऊ लागलो. जमेल त्यावेळी सहकुटुंब जाऊ लागलो. पुष्कळ श्रीसाई भक्तांची ओळख झाली. श्रीसाई भक्तांची ओळख होऊन त्यांच्याकडून श्रीसाई महात्मकथा समजत. त्यांचे अनुभव ते सांगत. विशेषतः संत (श्री दासगणू व श्री विठ्ठलराव ह्याचेकडून उपदेश प्रत्यक्ष मिळाल्यानी ह्या वरून श्रीसाई भक्ती दृढ झाली. १९४४ पासून रु. पाच भरून भक्तमंडळ सभासद झालो. तो आजपर्यंत सभासद आहेच. रहाता येथे मी नोकरीवर असे पर्यंतत मी शिर्डी येथे गुरुवार, उत्सव, समारंभ व इतर कार्यक्रम ह्यास शक्य तो हजर राहू लागलो. श्री दत्त गुरु हेच श्रीसाईबाबा आहेत. असा माझा त्यावेळी विश्वास वाटला व मी साईभक्त झालो. त्यावेळेपासून आतापर्यंत आयुष्यात येणाऱ्या आपत्तीस तोंड देऊन

मी कालक्रमणा करीत आहे. श्रीसाईवर भरवसा असल्यामुळे तो सर्व पार पाडीत असतो.

मी सेवानिवृत्त होते वेळी सुपरिटेंडंट ऑफ स्टोअर्स ह्या पदावर होतो. मुलांची शिक्षणे माझ्या अल्प वेतनातून पार पाडू शकलो. मला चार मुले आहेत. आज प्रत्येकाची मासिक प्राप्ती दरमहा हजाराचे पुढे आहे. एक मुलगा परदेशी नोकरीस असून त्यास ५६ पौंड आठवडा पगार आहे. हे सर्व श्री साईकृपेचे फळ होय. दोन मुली आहेत. त्या योग्य स्थळी पडलेल्या आहेत, व आनंदात आहेत.

मी साई भक्ती करतो म्हणजे रोज श्री साई पुजा इतर देवाबरोबर घरी करतो. देवाऱ्यात श्री साई तसबीर असते. रोज पुजा करून सकाळ संध्याकाळ साई अष्टक म्हणतो. संध्याकाळी घरातील सर्व श्रीसाईअष्टक म्हणून उदी लावून मगच भोजन करतात. तसेच सकाळी स्नान झाल्यावर श्रीसाईस नमस्कार करून उदी लावून मग पुढील कार्यक्रमास आरंभ करतात.

रोज उदी लावण्याचा क्रम सन १९४१ पासून चालू आहे. त्यामुळे पूर्वी सांगितल्याप्रमाणे क्षुल्लक संकटे नष्ट होतात. मोठमोठी आलेली संकटेही पार पडून जातात. श्री साईबाबांचेवर भार टाकून मी अगदी निशंक असतो. हे सर्व श्री साईकृपेचे फळ असा माझा दृढ विश्वास आहे. ●

# प्रसंगी धावून येणारे बाबा !

—श्री. दीपक राजाराम पांडव,
मु. पोस्ट आळे, ता. जुन्नर, जि. पुणे–आळे.

● पुण्यात लोहगावला **चातुर्मासात** काही साईभक्तांनी 'ॐ नमः शिवाय' च्या जपाचा चार कोटींचा संकल्प केला होता, त्यात माझ्या आईने सुद्धा भाग घेतला होता. आई राहाण्यास आळे (जुन्नर) ह्या खेडेगावी होती. त्यानुसार **देव्हाऱ्याच्या** वरती 'ॐ नमः शिवाय' लिहिलेला कागद चिकटविला होता. साईबाबांची पूजा करून 'ॐ नमः शिवाय' चा जप दररोज सकाळी ८॥ वाजता आई नियमित सुरू करीत असे. अशा प्रकारे जपाच्या समाप्तीचा दिवस उजाडला. (सोमवार ८–११–७६) नेहमीप्रमाणे पूजा आटोपून आई जपाला बसली. तो काय ! चार महिन्यापूर्वी

चिकटवून ठेवलेला ' ॐ नमः शिवाय ' लिहिलेला कागद नेमका त्या दिवशी आपोआप खाली निसटून पडला. तो एक-दोन वेळा पुनः पूर्वीप्रमाणे चिकटवण्याचा प्रयत्न केला परंतु यश आले नाही. 'आज समाप्तीचा दिवस, त्यामुळेच तो आज असा खाली पडतो आहे.' असा त्याचा अर्थ आईने लावला, परंतु तिचा मुलगा चि. सुनिल बाहेर संडासला गेलाय ( खेडेगाव असल्याने गावाबाहेर जावे लागते. ) त्याच्यावर कोणता प्रसंग गुदरला याची त्या बिचारीला कल्पनाही नव्हती. सुनीलला संडासला गेल्यावर अचानक चक्कर येऊन उभे रहाणे सुद्धा अशक्य होऊ लागले, तरी तसाच कसातरी तो घरी येऊन पलंगावर पडला. आई पहाते तो काय ! त्याच्या अंगातून घामाच्या धाराच्या धारा चालल्या होत्या. डोळ्यावर झापड होती. काय झाले तिला काहीच कळेना. नेमके त्या दिवशी वडील पुण्याला गेले होते. घरात ती एकटी. ' बाहेर संडासला गेल्यावर साप वगैरे चावला की काय !' वगैरे शंकांनी तर तिचा धीरच खचून गेला. त्याच्या अंगाला हात लावला तो पाय गार पडत चालले होते. तिला आणखीनच घाबरल्यासारखे झाले. एकटी काय करणार ! तिने मनोमन साईबाबांचा धावा केला, ' बाबारे, तूच आता माझ्या बाळाला वाचव.' व तशाच स्थितीत डॉक्टरांना फोन केला. डॉक्टर त्या गावापासून १॥ ते २ मैलावर होते. ते तरी कसे येणार ? आणि कधी ?... परंतु डॉक्टरांनी आईला धीर दिला कि, मी ताबडतोब माझी गाडी पाठवितो, त्यातून त्याला लगेच हॉस्पिटलमध्ये घेऊन या. म्हणजे त्याच्यावर पुरेसे उपचार करता येतील. नंतर गाडीची वाट पहात तिने 'बाबांचा' धावा चालूच ठेवला आणि काय आश्चर्य, फोन केल्यानंतर केवळ पाच मिनिटात डॉक्टरांची गाडी दारात हजर झाली व पुढील पाच मिनिटे संपण्याअगोदर हॉस्पिटलमध्ये पोचली सुद्धा ! तेथे सुद्धा डॉक्टर इतर पेशंट सोडून त्या गाडीची वाटच पहात होते. त्यांनी ताबडतोब चि. सुनिलवर उपचार केले आणि पाच ते दहा मिनिटात त्याच्या तब्बेतीत उतार पडला. आईला कल्पनाही नव्हती की, इतक्या लवकर उपचार होऊन त्याला लगेच बरे वाटेल. अर्ध्या तासाअगोदर मुलगा हातातून जात आहे अशी अवस्था असताना तो आता पूर्ण बरा झाला होता. कोणाची बरे ही कृपा ? मला हाक दिल्यावर त्याला मी ओ देतो हे बाबांनी पुन्हा एकदा आमच्या ह्या अनुभवाने दाखवून दिले आहे.

★

# बाबांनी माझे कुंकू राखले

—सौ. नीला प्रभू,
१२, "संपदा", गारोडिया नगर,
घाटकोपर, मुंबई ७७.

● माझे पती श्री. प्रभू ता. ३०-९-७६ रोजी दसऱ्याच्या उत्सवाला शिरडीला गेले होते. काला झाल्यावर उत्सवसमाप्तीनंतर ता. ४-१०-७६ ला दुपारी २ च्या शिरडी-मुंबई गाडीने ते मुंबईस यावयास निघाले. सोबत श्री. भूमकर, एस. टी. चे माजी डे. इंजिनियर व भक्तमंडळी होती. कसारा घाट येईपर्यंत एस. टी. गाडी अगदी व्यवस्थीत दौडत होती. त्यावेळी सायंकाळचा ६॥ चा सुमार झाला होता. गाडीतील सर्व साईभक्तांनी बाबांची आरती म्हणण्यास सुरवात केली, आरती झाल्यावर प्रसाद वाटण्यात आला. नंतर बाबांचे भजन सर्व साईभक्त करीत होते. त्याचवेळी गाडीचे ब्रेक्स नादुरुस्त झाले, गाडी नागमोडी वळणे घेत चालली होती. गाडीतील एकाँही साईभक्तास पुढे काय वाढून ठेवले आहे याची कल्पना नव्हती. सर्वांची साईभजनात एकाग्रता झाली होती. इतक्यात गाडीला जोराचा धक्का बसला तेव्हा सर्वजण ह्या नामसमाधीतून जागे झाले व काय झाले ! काय झाले ! असे विचारू लागले. ह्या वेळी एस. टी. च्या पुढे पोलिसांची जीप होती त्यांना अगदी मनोमन वाटत होते की ही गाडी आता घाटात कोसळणार. म्हणून ह्या गाडीबरोबर आपल्या गाडीलाही अपघात व्हावयास नको म्हणून त्यानी आपली गाडी पुढे नेली व ते एस. टी. गाडीवर लक्ष देऊन बसले. सर्व साईभक्तांच्या सुदैवाने ही गाडी चालविणारा चालक फार हुशार व प्रसंगावधानी होता. त्याने पाहिले की गाडी काही केल्या ताब्यात ठेवता येणार नाही तेव्हा इतक्या लोकांची प्राणहानी करण्यापेक्षा गाडीची नुकसानी केली तरी चालेल असे ठरवून त्याने डोंगराच्या बाजूने गाडी चालविण्यास सुरवात केली व वाटेत लागलेल्या नालीमध्ये गाडी घुसवून ती उभी केली. तशी उभी करण्यात देखील त्याने इतके चातुर्य दाखविले की ती गाडी जरा देखील हालत नव्हती. वाहतुकीस देखील अडथळा होत नव्हता. ह्या कौशल्याबद्दल सर्वांनी ड्रायव्हरची पाठ थोपटली व त्याला तेथल्या तेथे पैसे गोळा करून बक्षिस देण्यात आले. तसेच त्याचा खात्यातर्फे गौरव करावा अशी एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष श्री. आडारकर ह्यांना श्री. प्रभूंनी पत्र लिहून कळविले.

गाडी थांबवल्याबरोबर पोलिसाची पुढे गेलेली जीप परत मागे वळली व ते अपघाताच्या जागी आले त्यावेळी सर्व साईभक्त त्यांना काय झाले असे विचारू लागले.

तेव्हा त्या गाडीतले पोलिस अधिकारी सर्वांस तुम्ही सर्व दारु पिला होतात का ? असे विचारू लागले तेव्हा माझे यजमान श्री. प्रभू त्यांना म्हणाले की हो आम्ही नशेत होतो ही गोष्ट खरी आहे, परंतु ती नशा दारूची नव्हती, साईबाबांच्या भजनाची नशा होती. त्या ब्रह्मानंदात आम्ही असल्यामुळे आम्हाला काय झाले हे खरोखरीच ठाऊक नाही. आम्ही कोठून आलो आहोत ते तरी तुम्ही पाहिलेत का ? तेव्हा त्यांनी गाडीचा बोर्ड बघितला व माफी मागितली. नंतर त्यांनाही बाबांचा प्रसाद देण्यात आला. त्यांनी नंतर दुसरी पोलीस पार्टी येईपर्यंत ह्यांना संरक्षण दिले. तसेच इगतपुरी डेपोला दुसरी एस. टी. पाठविण्यासंबंधी निरोपही धाडला. नंतर रात्री ९॥ वाजता दुसरी एस. टी. आल्यावर सामानाची चढउतार झाल्यावर रात्रौ २ वाजता सर्वजण मुंबईस सुखरूप पोचलो.

या अपघातात ड्रायव्हरचे प्रसंगावधान आहेच. परंतु त्यावेळी बाबांचे भजन चालू असल्यामुळे कुणालाही या अपघाताची कल्पना आली नाही. सर्वजण भजनात दंग होते. न पेक्षा अपघाताच्या भीतीने सर्वांची गाळण उडाली असती व गाडीत आरडाओरडा झाला असता, आणि तसे झाले असते तर ड्रायव्हरलाही काही सुचले नसते व गाडी-वरचा त्याचा ताबा सुटून गाडी घाटात कोसळली असती. परंतु बाबांच्या नामस्मरणाने सर्वांना तारले. ही घटना ज्यावेळी घाटात घडत होती त्याचवेळी मी मुंबईस आमच्या देवघरात तिन्हीसांजची सांजवात लावत होते. बाबांच्या फोटोपुढे उदबत्ती लावून मी हात जोडून त्यावेळी बाबांचा आशीर्वाद मागत होते. ‘ जो जो मज भजे जैसा जैसा भावे तैसा तैसा पावे मीही त्यासी ’ ही बाबांची उक्ती बाबांनी खरी केली व माझ्या कुंकवाचे रक्षण केले. बाबा मी तुमची फार फार ऋणी आहे. असेच माझ्या संकटाचे वेळीं माझ्या पाठीशी रहा हीच तुमच्या चरणी माझी हात जोडून प्रार्थना.

*

---

# ........ ध्येय ........

—श्री. शाम जुवळे
जनार्दन भुवन, ९ छबिलदास रोड,
दादर, मुंबई – ४०००२८

● ध्याता जे ध्येय मनात बाळगून त्याविषयीचे ध्यान सतत करीत असतो ते तो अखेरीस गाठू शकतो; सरिता सागराला मिळण्याचे ध्येय उराशी बाळगून अव्याहत सागराच्या दिशेने वहात रहाते व अंती सागराला मिळून त्याच्याशी एकरूप होत असते.

अध्यात्म दृष्टीकोनातून पाहू गेल्यास मानवाचे ध्येय परमेश्वर प्राप्ती करून घेणे हेच असू शकते; मानव कोणत्याही कुळामध्ये, जातीमध्ये वा धर्मामध्ये जन्माला आलेला असला तरी ईश्वर आपलासा करून घेणे हा त्याचा जन्मसिद्ध हक्क मानला जातो. पोटापाण्यासाठी कोणताही धंदा वा नोकरी तो जन्मभर करीत राहील; परंतु फावल्यावेळी जर तो चिकाटीने सतत प्रयत्नपूर्वक राहून ईश्वर-सान्निध्यासाठी झटत राहील तर शेवटी तो यशस्वी होउन आपले ध्येय गाठल्याशिवाय रहाणार नाही.

श्रीसाईबाबांनी शिर्डीमध्ये वास्तव्य करून बहुजन समाजाला वरील ध्येयाविषयीची जागृती आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला होता. सर्व धर्मीयांना तसेच विद्वान-अविद्वानांना ते याच एका ध्येयाने प्रेरीत होऊन कळकळीचा उपदेश हरतऱ्हेने करीत असत. गरीबांना ते निक्षून सांगत असत की, गरीबी ही अव्वल बादशाही आहे आणि म्हणून ती परमेश्वर प्राप्तीसाठी पोषक अशीच आहे; श्रीमंतानासुद्धा ते त्यागधर्माची महती पटवून देऊन आपल्या ध्येयाप्रत वाटचाल करण्याची शिकवण देत असत; मध्यम वर्गीयांना तर ते पदोपदी अर्ध्या भाकरीवर संतुष्ट राहून आपले ध्येय गाठण्याचा उपदेश मोठ्या प्रेमाने करीत असत. अशा रीतीने सर्वांना ते या ध्येयाविषयी जागृक ठेवीत असत. या अपूर्व शिकवणूकीचा परिणाम म्हणून आज पन्नास वर्षांचा काळ लोटून गेला तरी श्रीसाईबाबांच्याविषयीची कृतज्ञताबुद्धी सर्व थरामध्ये जागरूक असलेली दृष्टीस पडते.

विवेकयुक्त वैराग्य हा श्रीसाईबाबांच्या शिकवणुकीचा मध्यबिंदू तसाच मानबिंदू होता; संसाराचा त्याग करून वैराग्य बाणविण्याचा उपदेश त्यांनी कधीच केला नाही. कर्मवशाने जी परिस्थिती प्राप्त झाली असेल त्यामध्येच विवेकाने राहून मनाने मात्र अल्पजीवी अशा जागतीक वस्तूंचा मोह न बाळगता वैराग्यवृत्ती धारण करावी, अशा तऱ्हेची बहुमोल शिकवण ते समाजास देत असत. ज्या भक्तांनी त्यांची ही मौलिक शिकवण ध्येय म्हणून आपल्या नजरेसमोर सतत ठेवून त्याप्रमाणे आपल्या जीवनाची दिशा आखली आहे. ते सर्व भक्त आज आनंदाने प्रपंच करून परमार्थाची वाटचाल श्रीसाईकृपेच्या छत्राखाली करीत आहेत.

ज्यांना जागतीक गोष्टींचा मोह अनावर झालेला आहे ते लोक मात्र आज या ध्येयाला पारखे झालेले आहेत. अज्ञानाने त्यांची दृष्टी झाकाळल्यामुळे त्यांच्या दृष्टीपथातून हे अमोल ध्येय निसटलेले दिसत आहे आणि म्हणून खरी शांती व आनंद यांना हे लोक वंचित झालेले दृष्टीस पडतात. विवेकयुक्त वैराग्याच्या अभावामुळे वरील प्रकारची अध्यात्मिक दैन्यावस्था येवून जीवन केविलवाणे बनले तर त्यात नवल नाही.

कणाकणाने क्षणाक्षणाला देह काळाकडून कुरतडला जात असता जर बुद्धीप्रधान माणसाला मानवी जीवनाचे कोडे उलगडता आले नाही तर सारे जीवन व्यर्थ खटाटोपीत

घालविल्यामुळे अंती पश्चाताप करीत बसण्याची वेळ आल्याविना रहाणार नाही. सारी संतमंडळी एवढ्याच करता निःस्वार्थबुद्धीने वेळोवेळी मानवाला जागृत करीत आलेली आहेत. त्यांचे वैयक्तिक जीवन ते याच ध्येयाने प्रेरीत होऊन कारणी लावीत असतात की जेणेकरून मानवाला त्यापासून प्रेरणा मिळून स्वतःचे वैयक्तिक जीवन सार्थकी लावता येईल.

या मानवी ध्येयाविषयी संत तुकारामांची खालील प्रसिद्ध उक्ती मानवाला मार्गदर्शकपर अशीच आहे :—

एवढ्याचसाठी केला अट्टाहास । शेवटचा दीस गोड व्हा ॥

संत ज्ञानेश्वराप्रमाणे सोनियाचा दिवस अमृते पहावयाचा झाल्यास वरील ध्येयावर लक्ष केंद्रित करून जीवन अमर बनविणे श्रेयस्कर ठरेल. संतश्रेष्ठ साईबाबांनीसुद्धा दसऱ्यासारख्या सोने लुटण्याच्या पवित्र दिनी सीमोल्लंघन करून आपली मंगल ज्योत अनंतात विलीन केली व आपल्या असंख्य लाडक्या भक्तांसाठी एक अभूतपूर्व असा आदर्श निर्माण करून ठेविला आहे.

संकल्प-विकल्प यांच्या आहारी न जाता आनंद व शांती यांचा उपभोग घेणे म्हणजेच प्रपंच करून परमार्थ साधणे होय; या ध्येयाचे ध्यान करता करता ध्याता ध्येयामध्ये विलीन झाला म्हणजे मानवी जन्माचे सार्थक झाले असे निःशंकपणे म्हणता येईल. ●

# साईकृपेमुळे भयानक विघ्न टळले

—सौ. विमलादेवी
श्रीजगदीश मंदिर, नागपूर

● ऑगस्ट १९७६. ता. १६–८–७६ ची घटना. त्या दिवशी श्रावण सोमवार होता. नित्यनेमाप्रमाणे माझे आई–वडील आमच्या शेतात गेले. सोबत काम करणारे मजुर पण होते. शेतातील फवारणी जवळ जवळ पूर्ण होत आली. म्हणून थोडा वेळ विश्रांती घ्यावी या उद्देशाने सायंकाळी ४ वाजता सर्वजण एकत्र बसून गप्पा करीत होते. शेतात ऊन–पावसापासून रक्षण व्हावे याकरिता एक छोटी झोपडी बांधलेली असते. त्या झोपडीतच सर्व मंडळी बसली होती. एवढयात माझ्या वडिलांच्या उजव्या खांद्यावर

काहीतरी लटकत असल्यासारखे त्यांना वाटले. त्यांना वाटले दोरी वगैरे असेल. पण नाही. तो दोन हात लांब असा अस्सल नाग होता. नंतर त्या नागराजाने त्यांच्या उजव्या खांद्यावरून उतरून खाली उडी घेतली तेव्हा तो सर्वांना दिसला. या प्रकारामुळे सर्वजण घाबरले पण त्या नागाने कुठल्याही प्रकारची इजा केली नाही. साईबाबा प्रत्यक्ष शिव आहेत. असा आमचा अनुभव आहे. बाबांच्या कृपादृष्टीने माझ्या वडिलांवरचे विघ्न टळले. साईबाबांचे हे अनंत उपकार जन्मोजन्मी तरी फिटतील का ? बाबांचे हे ब्रीदवाक्यच आहे. ते आपल्या भक्तांना काळाच्या दाढेतून वाचवितात. 'कृतांताच्या दाढेतून । काढीन मी निजभक्ता ओढून' या वाक्याप्रमाणे बाबांनी माझ्या वडिलांना काळाच्या दाढेतून वाचविले व आम्हा भगिनींचे पितृछत्र आमच्या शिरावर अबाधित ठेवले. धन्य साईबाबा अशीच कृपादृष्टी आम्हा पामरांवर ठेवावी ही आपल्या मंगलमय पावनचरणी प्रार्थना.

"कौन छूयेगा उसकी परछाई रे ।
जिसको बचानेवाला साई
जय जय साई रघुराई"

# वाचकांचा पत्रव्यवहार

श्री. संपादक महाशय 'साईलीला' यासी,

स. न. वि. वि.

आपल्या मासिकाचे आम्ही बरेच वर्षांपासून वाचक आहोत व मधून मधून आमचे अनुभवसिद्ध लेखही मासिकात प्रसिद्ध झालेले आहेत. सन १९७६ चा 'दिवाळी-विशेषांक' मधील श्री बाबांच्या विविध अनुभवांचा गच्च भरलेला ग्रंथरुपी अंक वाचून मनास मानसिक व बौद्धिक समाधान वाटले. असा विशेषांक प्रसिद्ध केल्याबद्दल आपणास धन्यवाद.

अशा विशेषांकासाठी लेख पाठविणेचा विचार आमचे मनात घोळत होता परंतु काही अपरिहार्य कारणास्तव आपल्या मुदतीत लेख पाठविणेस जुळले नाही म्हणून मनास सारखी चूटपूट लागली होती. परंतु आमचा सन १९७२ साली आपणाकडे संग्रही असलेला "श्री साईबाबांच्या कृपेचा अनुभव" हा लेख आमचे ध्यानी-मनी

नसताना सुद्धा प्रसिद्ध झालेला पाहून आम्हास आश्चर्य व मनाची चुटपूट दूर झाल्याचा आनंद वाटला. खरोखर भगवान श्री साईबाबांनी भक्ताची श्रद्धा व इच्छा पूर्ण करणेस कृपादृष्टीच होय.

विनित,

**सी. एच ढापरे,**

**सौ. शालिनी सी. ढापरे,**

मु. पोस्ट–फणसा, स्टे. भिलाड,

जिल्हा–बलसाड ( गुजरात राज्य ).

सप्रेम नमस्कार वि. वि.

श्रीसाईलीला मासिकाचा दिवाळी अंक दिवाळीपूर्वीच हाती आला. इतर मासिकांचे दिवाळी अंक म्हणजे पैसे मिळविण्याची पर्वणीच. कोणत्यातरी स्त्रीचा किंवा सिनेमानटीचा मुखपृष्ठावर फोटो, लघुकथा, व्यंगचित्रांचा विनोद, प्रेमकथा, विरहकाव्य भरपूर जाहिराती हा मसाला ठरलेला असतो.

तथापि श्रीसाईलीला मासिकाचा दिवाळी अंक खास वैशिष्ट्यपूर्ण आहे. श्रीसाईबाबांच्या जागत्या समाधीच्या ज्योतीला मंगल प्रकाशाने अंकाचे पाननीपान उजळून निघाले आहे. बाबांच्या उदीच्या प्रभावाने व पावित्र्याने अंकाचे पाननीपान पावन झाले. भक्तांना झालेल्या असंख्य अनुभवांच्या गंगेत वाचकाला अवगाहन केल्याचे समाधान मिळते.

‘ मी माझीया भक्तांचा अंकिला ।
आहे पासींच उभा ठाकला ।
प्रेमाचामी सदा भुकेला ।
हाकेला हाक देतसे ॥ ११–७६ ॥

साईसाई नित्य म्हणाल ।
सात समुद्र करीन न्याहाल ।
या बोला विश्वास ठेवाल ।
पावाल कल्याण निश्चये ।
नलगे मजपूजा संभार ।
षोडशवा अष्टोपचार ।
जेथे भाव अपरंपार ।
मजला थार ते ठायी ॥ १३–१२।१३ ॥

आकंठ संकटार्णवी बुडाला ।
हो का महद्दुःखगर्तेत बुडाला ।
जो या मशिदमाईची करील प्रति पाळु ।
तो कनवाळु सकळांचा ॥ १३–७३।७४ ॥

श्रीसाईबाबांनी आपल्या भक्तांना दिलेली ही आश्वासने चिरकाल अबाधित असल्याची प्रचीती बाबांचे भक्त आजही अनुभवीत आहेत. दिवाळी अंकाचे प्रत्येक पाननीपान याची साक्ष देत आहे.

श्रीसाईबाबांच्या लीला अगाध आहेत. अगम्य आहेत. त्यांचे मूल्यमापन करणे शक्ती बाहेरचे काम आहे. त्यांच्या चरणी मस्तक ठेवून भक्तीभावाने प्रार्थना करण्या-सारखा दुसरा आनंद नाही. बाबा, आपल्ना सर्व भक्तांचे शुभंभवतु एवढीच तुमच्या-चरणी या दासाची प्रार्थना आहे.

**गं. रा.. भट**
संदेश हौसिंग सोसायटी,
सामंतवाडी, सोनावाला रोड,
गोरेगाव, मुंबई ६३

श्री संपादक साईलीला यास

स. न. वि. वि.

आपला दिपावली "श्री साईलीला" विशेषांक हाती आला. केंव्हा एकवेळ वाचून काढतो असे आमच्या मनाला झाले. सर्व लेख वाचले. यंदाचा श्री साईलीला दिवाळी अंक मनमोहक आकर्षक आहे. मुखपृष्ठाने अधिकच भर दिली आहे. सतत सोबत हवा हवासा वाटणारा अंक आम्हा सर्वांना अतिशय आवडला.

विशेष या सर्वांग सुंदर अंकात प्रसिद्ध कवी श्री. दत्ताराम बारस्कर तसेच इतर अनेक प्रसिद्ध लेखक, साईभक्तांनी हजेरी दिली आहे. त्या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतो. स्वस्त तसाच संग्रही असा "श्रीसाईलीला" दिवाळी अंक आम्हा सर्वांस अतिशय आवडला. श्री साई महाराजांचे साक्षात्कार अनुभव सर्व साई जनतेसमोर जे जे प्रस्तुत करतात, त्या सर्वांना धन्यवाद. हे दिपावली नूतन वर्ष साईकृपेने तुम्हा आम्हास सुख समृद्धिचे जावो.

**– सुभाष अंकुश सावंत**
जे/१२, मुकेशमिल कंपौंड,
कुलाबा, मुंबई ५.

### श्री क्षेत्र शिरडी येथे साजरा झालेला

# ४६ वा वार्षिक कोजागिरी पौर्णिमा उत्सव

● आश्विन शुद्ध पौर्णिमा ही कोजागिरी पौर्णिमा! कोजागिरी पौर्णिमेला 'को जागर्ति ?' असा प्रश्न विचारत लक्ष्मी सर्वत्र फिरत असते व जे लोक त्यावेळी जागे असतील त्यांवर ती कृपा करते. अशी सर्वांची भावना आहे. म्हणून त्या रात्री जागर करून पूर्णचंद्र डोक्यावर येताच मसाल्याचे अमृततुल्य दूध सर्वजण मिळून मोठ्या आनंदाने पितात.

१९२९ च्या शिरडी येथील कोजागिरी पौर्णिमेच्या उत्सवसमाप्तीनंतर डॉ. यशवंत जनार्दन गाळवणकर यांनी मोठ्या प्रेमाने व विश्वासाने ह्या उत्सवाची माळ डॉ. केशव भगवंत उर्फ आण्णासाहेब गव्हाणकर ह्यांच्या गळ्यात घातली व १९३० सालापासून आजतागायत गेली ४६ वर्षे ही परंपरा अव्याहतपणे आण्णासाहेबांनी पुढे चालविली आहे.

यंदाचा उत्सवही त्या परपंरेला साजेसाच होता. गुरुवारी दि. ७ ऑक्टोबर रोजी मुंबईहून एका खास एस. टी. बसने ५५ भक्तमंडळी शिरडीस रवाना झाली. त्यात डॉ. गव्हाणकरांच्या कुटुंबियांखेरीज सौ. प्रभाताई अवस्थी, अॅटमिक एनर्जीचे अॅडमिस्ट्रेटिव्ह ऑफिसर श्री. परुळेकर व सौ. परुळेकर, एअर-इंडियाचे श्री. पिसाट व सौ. पिसाट, बँक ऑफ इंडिया स्टाफ ट्रेनिंग कॉलेजचे प्रोफेसर श्री. क. दा. सामंत वगैरे प्रमुख मंडळींचा समावेश होता. त्याशिवाय बरीचशी कलावंत मंडळी रेल्वेने शिरडीस पोहोचली होती. आमंत्रितात मुंबईचे श्री. एस. पी. कोरगांवकर व धन्तोली, नागपूरचे श्री. विजयबाबा ह्यांचा अवश्य उल्लेख केला पाहिजे.

गुरुवार दि. ७ रोजी श्रीबाबांच्या पालखी मिरवणुकीनंतर रात्रौ १०-१५ ते ११ वाजेपर्यंत डॉ. गव्हाणकरांचें 'भाव तेथे देव' ह्या विषयावर समाधि मंदिरात मोठे अभ्यासपूर्ण व रसाळ प्रवचन झाले. त्यानंतर ११ ते १२ श्री. विजयबाबांनी आल्या भावपूर्ण व सुस्वर आवाजात भजने म्हणून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

रात्रौ ठीक बारा वाजता माननीय रिसीव्हर श्री. पाठकसाहेब व सौ. पाठक ह्यांनी विधीपूर्वक पूजा आटोपल्यानंतर सर्व उपस्थितांना प्रसाद व मसाल्याचे दूध वाटण्यात आले व नंतर जागराच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. रेडिओस्टार श्री. शशिकांत पुसाळकर, अनंत पांचाळ, कु. शोभा नाईक, प्रो. कवीश्वर आदि कलाकारांनी भक्तिगीते व भावगीते म्हटली. शाहीर सुखदेव कांबळी व त्यांचे साथीदार अशोक सावंत, विनायक लाड, कु. माणिक मयेकर, एकनाथ धनवडे, विलास बिर्जे, रामचंद्र भोभाटे ह्यांनी गोंधळ, नमन, वाघ्यामुरळी, कव्वाली,

लावणी ह्याखेरीज "मुंबईचे वाजले तेरा" हे लोकनाट्य सादर केले. नेहमीप्रमाणे सर्व कार्यक्रमात श्री. आप्पा सामंत ह्यांनी ढोलकीची उत्कृष्ट साथ केली.

रात्री बारा वाजता सुरू झालेले जागराचे कार्यक्रम पहाटे पाच वाजता संपले त्यावेळी प्रेक्षकवर्ग एका आगळ्याच धुंदीत होता.

शेहेचाळीस वर्षांपूर्वी केवळ चारपाच सहकाऱ्यांना बरोबर घेऊन डॉ. गव्हाणकरांनी सुरू केलेल्या ह्या वार्षिक उत्सवाचे व्यापक स्वरूप लक्षात घेता त्याचा रौप्यमहोत्सव येत्या चार वर्षांनंतर मोठ्या धुमधडाक्याने साजरा होणार ह्यात काय संशय ?

●

## साई सेवा धाम ( पिंळगाव-गोवा )

● समस्त भक्तजनांस कळविण्यास आनंद वाटतो की प्रतिवर्षाप्रमाणे गोमांतकीय पिळगाव येथे साई सेवा धाम या संस्थेच्यावतीने साईबाबांच्या पुण्यतिथीचा सोहळा ता. २ ते ४ सप्टेंबर पर्यंत मोठ्या थाटामाटात साजरा झाला व विजयादशमीच्या सुमुहूर्तावर द्वारकामाई मंदिराचा पायाभरणी समारंभ प्रख्यात साईभक्त श्री. गजानन दत्ता गवंडळकर यांच्या शुभ हस्ते सकाळी ९–५५ वाजता दिनांक २–१०–७६ रोजी पार पडला. साई सेवा धाम संस्थेचे आद्य संस्थापक श्री. पांडुरंग गणू शिरोडकर ह्यांच्या हस्ते भूमिपूजन विधी वेद मंत्र संपन्न गोविंद रामेश्वर सायनेकर ह्यांच्या उपस्थितीत पार पडला.

शनिवार ता. २--१०–७६—सकाळी ५-१५ वाजता काकड आरती—सकाळी ७–३० वाजता. भक्ताकडून अभिषेक—सकाळी ९-५५ वाजता. पायाभरणी समारंभ—सकाळी १०-३० वाजता. मडगाव येथील सत्यसाईबाबांच्या महिला भक्तगणांचा सुश्राव्य भक्तीगीतांचा बहारदार कार्यक्रम—दुपारी १२ ३० वाजता महापूजा, आरती, मंत्रपुष्पांजली. नंतर गोपी उसापकर बंधूतर्फे समाराधना कार्यक्रम. संध्याकाळी ६-३० वाजता धूपारती व ह. भ. प. मणेरकर बुवा यांचे सुमधुर बोधप्रद किर्तनाचा कार्यक्रम. रात्रौ १० ते पहाटे ५ वाजेपर्यंत गोमंतकात नाणावलेल्या भक्तांच्या कार्यक्रम. सर्वश्री बाबा कापडी, सोमनाथ चारी, कमलाकान्त धोंड, रघुनाथ पेडणेकर, जगन्नाथ पेटकर, काशिनाथ नार्वेकर, शशिकान्त गोखले व स्थानिक कलावंतांनी ह्यात भाग घेतला. तबल्याची साथ श्री. वामन पिळगावकर व हार्मोनियम श्रीधर पिळगांवकर ह्यांनी केली.

रविवार ता. ३-१०-७६ सकाळी ७ वाजता श्री साईबाबांची पूजा सकाळी ७-३० ते १२ वाजेपर्यंत भक्तांकडून अभिषेक, आरती, मंत्र पुष्पांजली—संध्याकाळी ५ वाजता

श्रीसाईबाबांच्या प्रतिमेची व पादुकांची पालखीसह गावातून मिरवणूक, पालखीच्या मिरवणूकीत गोमंतकातील आसपासच्या परिसरातील तसेच मुंबईहून खास कार्य-क्रमासाठी आलेल्या पाहुण्यांनी उत्साहाने भाग घेतला. सर्वांच्या मुखातून साईनामाचा प्रचंड गजर सतत चालू होता. सोबतीला बँड, ढोल, तसेच भजन मंडळी ह्यांनी आप-आपल्या वाद्यांनी आसमंत दुमदूमून टाकला होता. अशा वेळी सृष्टीदेवता सुद्धा जणू स्वागतासाठी प्रसन्न होती. जणू काय आपण शिरडीतच आहोत असाच जणू भास होत होता. बाहेर गावाहून येणाऱ्या गाड्यांची जणू काय रिघ लागली होती. संध्याकाळी ५ वाजता निघालेली ही मिरवणूक रात्रौ १०-३० वाजता आपल्या नियोजित स्थळी परत आली. भक्तगणांच्या आनंदाला जणू उधाणच आले होते. प्रत्येक जण बेभान होऊन अक्षरशः मिरवणूकीत नाचत होता. ठिकठिकाणी गावातील रहिवाशांनी पाल-खीला थांबवून आरत्या ओवाळल्या. साईबाबांच्या प्रतिमेची पूजा केली. सर्वांना प्रसाद वाटला. तसेच त्यांनी फटाके वाजवून आपला आनंद प्रदर्शित केला. सर्व गावकरी आपले मतभेद विसरून जणू ह्या बाबांच्या कार्यात सामील झाले होते. त्यात गावातील स्थानिक मुसलमान बंधू भगिनींनी सुद्धा फारच उत्साहाने भाग घेतला. रात्रौ ११ वाजता स्थानिक कलावंतांतर्फे (साईनाथ बाल मंडळ) 'सैतानी फास' ह्या नाटकाचा प्रयोग करण्यात आला. प्रेक्षकांची अफाट गर्दी जमली होती. संस्थेच्या वतीने प्रेक्षकांची उत्तम व्यवस्था करण्यात आली. अचानक आकाशात ढग जमू लागले. विजेचा कडकडाट सुरू झाला. व मंदगतीने पाऊस पण पडायला सुरवात झाली. आता मात्र सर्वांनाच असे वाटले की नाटकाचा प्रयोग पावसामुळे होऊ शकणार नाही. प्रेक्षक मात्र जरासुद्धा चलबिचल झाले नाहीत, किंवा जागेवरून उठले नाहीत. मात्र सर्वांनी साईबाबांची मनातल्या मनात आराधना केली की नाटकाचा प्रयोग व्यवस्थीतरित्या पार पडू दे. आणि काय आश्चर्य, ढग हळु-हळु पसरत गेले, विजेचा कडकडाट थांबला व कुठलाही प्रकारे पावसाचा व्यत्यय न होता नाटकाचा प्रयोग यशस्वीरित्या पार पडला. सर्वांनी साईबाबांच्या चमत्काराची जाणीव झाली.

सोमवार, तारीख ४-१०-७६

सकाळी ५-१५ वाजता काकड आरती. सकाळी ७-३० वाजता भक्ताकडून अभिषेक संध्याकाळी ८-३० वाजता ह. भ. प. मणेरकरबुवा (मु. कुडाळ) ह्यांचे काल्याचे किर्तन झाले. काल्याचे किर्तन त्यांच्या अमृतवाणीने फारच रंगवून सोडले. संस्थेचे अध्यक्ष ह्यांनी कृष्णाला आपल्या खांद्यावर बसवून दहीहंडी फोडण्यात आली. पेंद्या, कृष्ण यांनी आपल्या वेषभूषेने प्रेक्षकांचे मन मोहित करून टाकले. संस्थेचे अध्यक्ष व इतर यांनी रासक्रिडेत भाग घेतला. साईसेवाधाम कमेटीतील सर्वच पदाधि-काऱ्यांनी येणाऱ्या हजारो भक्तांची चोख व्यवस्था ठेवली व अशातऱ्हेने आनंदाच्या। वातावरणात समारंभाची सांगता झाली. ●

# श्रीसाईबाबा मंदिर, धन्तोली–नागपूर

लेखक : श्री. चंद्रकांत दामोदर सामंत

● नागपूरला धन्तोली ह्या भागात सुशिक्षित व उच्चवर्गीयांची प्रामुख्याने वस्ती आहे. ह्याच विभागात श्रीसाईनाथांचे एक मंदिर असून त्याची स्थापना विजयादशमी दि. ३ ऑक्टोबर १९५७ हया दिवशी झाली. नागपुरातील श्रीबाबांचे असे हे पहिलेच मंदिर.

मंदिर सध्या श्री. कोंड्राबंधूंच्या राहत्या घराच्या दिवाणखान्यात असून मंदिराच्या स्वतःच्या जागेत इमारत बांधण्याचे काम चालू आहे. थोडयाच दिवसात हे मंदिर वर्धा रोडवरील जागेत हलविण्यात येणार आहे.

मंदिरातील श्रीबाबांची मूर्ति २॥ फूट उंच असून ५ फूट लांब व ३ फूट रुंद अशा मार्बलच्या चौथऱ्यावर ती विराजमान झाली आहे.

मंदिराची दैनंदिन व्यवस्था ह्या कोंड्राबंधूंपैकी श्री. विजयबाबा हे जातीने पाहतात. सदर मंदिराचा इतिहास हा विजयबाबांच्या जीवनाशी निगडीत व श्रीसाईभक्तांना उद्बोधक वाटेल असाच आहे.

कै. उमाकांत नरसिंगराव कोंड्रा ह्यांचे विजय हे द्वितीय चिरंजीव. विजयबाबा हे सध्या ३५ वर्षांचे असून त्यांचा जन्म १९४१ साली दसऱ्याला झाला. वयाच्या सोळाव्या वर्षी विजयबाबा अतिशय आजारी होते. विशेषतः जून १६, १९५७ ह्या दिवशी दुपारच्या वेळी त्यांची अस्वस्थता तर फारच वाढली होती. उपस्थित डॉक्टरांनी त्यांच्या जगण्याची आशाच सोडली होती. अशा प्रसंगी श्रीबाबांनी एका दृष्टांताद्वारे विजयबाबांना आपली आमरण सेवा करण्याची आज्ञा केली व तेव्हापासून हळुहळू त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होऊन विजयबाबा साफ बरे झाले. त्यावेळेपासून त्यांनी आपले तन मन धन श्रीबाबांनाच अक्षरशः अर्पण केले आहे व श्रीबाबांनीही त्यांची सेवा मान्य करून घेतली आहे. ह्याबाबतीतील एक अनुभव सांगण्यासारखा आहे.

"श्रीसाईसत्चरिता"च्या २९ व्या अध्यायाच्या १८० ते १९० ह्या ओव्यात श्री. वामन नार्वेकर ह्या भक्ताची गोष्ट आलेली आहे. ह्या भक्ताने श्रीबाबांजवळ श्रीमारुतीरायाची मूर्ति एका बाजूस व श्रीरामलक्ष्मणसीता ह्यांची दुसऱ्या बाजूस असलेले रुपयाचे नाणे देऊन ते प्रसाद म्हणून परत मिळावे अशी इच्छा व्यक्त केली. श्रीसाईनाथानी त्याच्या विनंतीचा अव्हेर करून ते नाणे श्यामा उर्फ माधवराव देशपांडे

ह्यांस पूजेसाठी दिले होते हे सर्वश्रुतच आहे. काही काळापूर्वी श्यामाचे चिरंजीव व शिरडी येथील पुजारी श्री. उद्धव ह्यांना श्रीबाबांनी ते नाणे विजयबाबांना देण्याविषयी स्वप्नाद्वारे सुचविले. त्याप्रमाणे ते रुपयाचे नाणे सध्या विजयबाबांच्या संग्रही आहे.

मंदिरात श्रीबाबांना रोज स्नान घालण्यात येते व सकाळी ८ वाजता, दुपारी बारा वाजता, तसेच सायंकाळी साडेसात वाजता आरती होते. दर शनिवारी रात्री ९ वाजता भजन, किर्तनाचा कार्यक्रम असतो. मंदिराला आतापावेतो कै. संत तुकडोजी महाराज, काटेलचे विद्यमान संत श्रीगुलाबबाबा, साकोरीच्या पूज्य गोदावरी माता, कुर्ल्याचे डॉक्टर अण्णासाहेब गवाणकर, नागपूरचे साहित्यिक व पत्रकार कै. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, सुप्रसिद्ध गायिका श्रीमती हिराबाई बडोदेकर आदि नामवंत मंडळींनी भेट दिलेली आहे.

मंदिरातर्फे १९६१ मध्ये एक यज्ञ पार पाडण्यात आला होता. तसेच श्रीबाबांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमित्त दहा दिवस श्रीशतचंडी यज्ञ आयोजित करण्यात आला होता.

श्रीविजयबाबा गोदावरीमाताना आपल्या गुरुस्थानी मानतात व त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपले कार्य चालवितात. १९७२ साली माताजींबरोबर त्यांना लंडन, फ्रान्स, जर्मनी इत्यादी देशांचा ३५ दिवसांचा दौरा करण्याचा सुयोग प्राप्त झाला होता. धन्तोली व आसपासच्या भागातील लोकांना श्रीसाईबाबांच्या भक्तीला लावून, त्यांच्या जीवनाचे सार्थक करण्याचे महान कार्य हे मंदिर आपल्या परीने पार पाडत आहे ह्यात संशय नाही. ▲▲▲


## श्रीसाईलीला

### तिसरे लेखक-कवी स्नेहसंमेलन — १९७७

दिनांक— रविवार ३० / सोमवार ३१ } जानेवारी १९७७

स्थळ— श्री साईबाबा संस्थान, शिर्डी

प्रमुख पाहुणे— श्री. अनंत जयदेव चितांबर,
अहमदनगर

श्रीसाईबाबांच्या पूर्ववृत्तासंबंधीचा माहितीपूर्ण लेख

# श्रीसाईनाथ महाराज

— पांडुरंग कृष्ण बेंगेरी, (पुणे)
प्राचार्य कर्नाटक हायस्कूल, कर्वे रस्ता, पुणे ४.

[ श्रीसाईनाथ महाराजांचे गुरुबंधू म्हणविणारे श्री हिमालय राजर्षी बालसंन्यासी यांनी श्रीपराशक्ती आश्रम, बंगलोर येथून १९५० साली श्रीसाईनाथ महाराज यांच्या सूचनेवरून श्रीसाईनाथ महाराजांचे एक छोटेसे चरित्र लिहिले आहे. ते चरित्र कन्नड भाषेत आहे. त्यातील श्रीसाईनाथ महाराजांची शिरडीस प्रकट होण्यापूर्वीची माहिती नावीन्यपूर्ण वाटल्यावरून श्रीसाईलीलेच्या वाचकांसाठी ती सादर करीत आहोत. ]

● श्री हिमालय राजर्षी बालसंन्यासी यांनी आणि श्रीसाईनाथ महाराजांनी हिमालयात राहाणारे श्री रामचंद्र बाबाजी यांच्याकडून पराशक्ती-मंत्र घेतला. इतरही अनेक मंत्र घेतले. तेथेच गुरूंच्या आश्रमात तप केले. त्यामुळे मंत्रसिद्धी प्राप्त झाली. पुढे काही काळाने गुरूंच्या आज्ञेने ते स्थान सोडले व यमुना नदीच्या तीरावरील एका निसर्गरम्य स्थानी तपःश्चर्या केली. ती पूर्ण झाल्यानंतर धर्मरक्षणार्थ ते दक्षिणेकडे आले. शिरडीस आले. तेथे पुन्हा दोन वर्षे तपःश्चर्या करून वयाच्या सोळाव्या वर्षी ते शिरडीत निंबाखाली प्रकट झाले. तेथून पुढील सर्व घटना श्रीसाईसच्चरितात वर्णन केल्याप्रमाणे त्यांचे महात्म्य विशद करणाऱ्या आहेत.

श्री हिमालय राजर्षी बालसंन्यासी आपण लिहिलेल्या चरित्रात श्रीसाईनाथ महाराजांविषयी खालील माहिती देतात —

गुजराथ देशातील एका अत्यंत सुशील, धर्मनिष्ठ अशा ब्राह्मण मातापितरांच्या पोटी श्रीसाईनाथ महाराजांचा जन्म झाला. त्यांच्या पित्याचे नाव नंदलाल व आईचे नाव यमुना.

या पतिपत्नींना बरीच वर्षे मूलबाळ नव्हते. त्यामुळे त्यांनी घराचा त्याग करून अखिल भारतातील पवित्र स्थळांच्या तीर्थयात्रा केल्या. काशी, प्रयाग, अयोध्या, द्वारका, वृंदावन, कुरुक्षेत्र, हरिद्वार, बद्रिकाश्रम, चित्रकूट, नाशिक, इत्यादी ठिकाणी थोडेफार वास्तव्यही केले. भारतातील तीर्थक्षेत्रे संपल्यानंतर एका मुसलमान यात्रेकरूच्या सोबतीने इ. स. १८५२ मध्ये ते मक्केच्या यात्रेस गेले. तेथे पवित्र काबाचे दर्शन घेऊन व इतरही पवित्र स्थानांचे दर्शन घेऊन त्या मुसलमान यात्रेकरूसमवेत ते खिस्तजन्माची पवित्र भूमी जेरुसलेम येथे गेले. तेथे असताना ११ मार्च, १८५८ या दिवशी रात्री ९ वाजता यमुनाबाईंनी एका पुत्रास जन्म दिला. तो पुत्र म्हणजेच श्रीसाईनाथ महाराज होत.

त्या लहान बाळाला तो मुसलमान यात्रेकरू 'श्रीसाई' या नावाने संबोधे, तर त्याची मातापितरे त्याला 'श्रीसाईराम' म्हणत.

इ. स. १८६३ साली म्हणजे ते बालक पाच वर्षांचे असताना त्याचे वडील वारले. पुढे पाच-सहा महिन्यातच त्या बाळाच्या नशिबी मातृवियोगही आला. त्यामुळे त्याच्या संगोपनाची व शिक्षणाची सर्व जबाबदारी त्या यात्रेकरू मुसलमानावर येऊन पडली.

तो यात्रेकरू दक्षिण हैदराबादचा राहाणारा असल्यामुळे त्याने त्या पाच-सहा वर्षे वयाच्या मुलास आपणाबरोबर हैदराबादेस आणले. तेथे त्याच्या शिक्षणाची सोय लागवी म्हणून पात्री ग्रामी राहात असलेल्या श्री वेंकूश किंवा व्यंकटेशगुरू किंवा श्री गोपाळराव देशमुख या वैराग्यमूर्ती, तपस्वी ब्राह्मणाच्या स्वाधीन त्याला केले. अशा रीतीने श्री वेंकटेशगुरू हेच श्रीसाईनाथ महाराजांचे पहिले गुरू होत.

या मुलास शालेय शिक्षण मुळीच लाभले नाही. तथापि पूर्वसुकृत बलवत्तर असल्यामुळे जन्मतःच ज्ञान-भक्ती-वैराग्य या मुलास सहजच प्राप्त झाले.

इ. स. १८६८ मध्ये म्हणजे वयाच्या दहाव्या वर्षी श्री वेंकटेशगुरू यांच्या आज्ञेने काही यात्रेकरूंसमवेत हा मुलगा वृंदावनाच्या यात्रेस जाण्यास निघाला. मदुरेच्या मार्गावर असताना यात्रेकरूंच्या त्या मेळाव्याची व या मुलाची चुकामूक झाली व तो एकटाच मागे राहिला. एक दिवस प्रवासातील वाटचालीने थकून भागून एका अश्वत्थ-वृक्षाखाली तो झोपला असताना त्याला एक दिव्य स्वप्न पडले. स्वप्नात हिमालयातील जीवन्मुक्तावस्थेतील, साक्षात् परब्रह्मस्वरूप असे श्री रामचंद्र बाबाजी आले. अत्यंत तेजःपुंज अशा रामचंद्रबाबांनी या मुलासमोर उभे राहून अत्यंत प्रेमपूर्ण अशा दृष्टीने एकवेळ त्याच्याकडे पाहिले मात्र — त्या मुलास सहजच ज्ञानप्राप्ती झाली. तो ज्ञानरूप चैतन्यरूप झाला.

या दिव्य स्वप्नानंतर तो मुलगा श्रीरामचंद्र बाबाजी या स्वप्नातील गुरूंना शोधीत हिमालयाच्या दिशेने निघाला. तेथे त्याची व सद्गुरू श्रीरामचंद्र बाबाजी यांची भेट झाली. तेथे, वर सांगितल्याप्रमाणे ज्ञानप्राप्ती होऊन तो यमुना तीरावर तपश्चर्येसाठी गेला. तेथून तो प्रकट झाला तो निंबातळीच. इ. स. १८७६ मध्ये.

ooo

# शिरडी-वृत्त-माहे सप्टेंबर सन १९७६

या महिन्यात बाहेर गावचे साईभक्तांची गर्दी कमी प्रमाणात होती. काही कलाकारांनी श्रीपुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :-

**कीर्तने :-**

१) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली.
२) ह. भ. प. शिऊबाई प्रे. चव्हाण सोलापूर यांचे कीर्तन.
३) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे शिर्डी यांचे कीर्तन.
४) ह. भ. प. हिंमतराव वे. मोरे चाळीसगाव यांचे कीर्तन.
५) ह. भ. प. विश्राम बा. ठुबे यांचे कीर्तन झाले.

**भजन, गायन, वादन :-**

१) श्री. डी. आर. कोरीयनकर व भजनीमंडळी मुंबई ५७. २) श्री. बाळकृष्ण वादाणी, औरंगाबाद ३) कु. चारूशीला बेलसरे, ठाणे २. ४) श्री. मनोहर बा. कदम ठाणे ५) वसंत र. कुलकर्णी व बॅण्ड पथक, कल्याण. ६) कु. सुनंदा जोग, मुंबई ७) श्री श्रीराम विष्णू सातर्डेकर, मुंबई १२. ८) डॉ. एम. के. कीर्तीकर, मुंबई १४.

**माननीयांच्या भेटी :-**

१) मा. श्री. ए. एम. कैरे. I.A.S. मॅनेजिंग डायरेक्टर, टेक्सकॉम आणि मराठवाडा डेव्हलपमेंट कार्पोरेशन, औरंगाबाद.
२) मा. श्री. के. एस. माणिकशेट्टी-F.C.S. सेक्रेटरी टेक्सकॉम, औरंगाबाद.
३) मा. श्री. यशवंतरावजी चव्हाण, परराष्ट्रमंत्री, केन्द्र सरकार न्यू दिल्ली.
४) मा. श्री. आर. टी. नाडकर्णी, डेप्युटी सेक्रेटरी, मुख्य विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई.
५) मा. श्री. एन. के. पारेख, सिटी सिव्हील व सेशन जज्ज, मुंबई.
६) मा. श्री. उदयसिंगराव गायकवाड, राज्यमंत्री (ग्राम विकास व उद्योग) महाराष्ट्र राज्य.
७) मा. श्री. चंद्र शेखर प्रभात, डे. मिनीस्टर, अर्थखाते, मध्य प्रदेश.
८) मा. स्वामी प्रकाशनंदजी, सप्तश्रृंगी गड वणी नासिक.
९) मा. श्री. विजयसिंग ठाकूर, I.A.S. कलेक्टर, अहमदनगर.

# शिरडी-वृत्त माहे ऑक्टोबर सन १९७६

## – दसरा उत्सव –

या महिन्यात श्री साईबाबांची पुण्यतिथी उत्सव असल्यामुळे श्रीच्या दर्शनासाठी बाहेरगांवाहून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी बरीच होती. सालाबादप्रमाणे उत्सव मोठया थाटात साजरा झाला.

दसरा उत्सव १ ला दिवस:– शुक्रवार दि. १-१०-७६ रोजी पहाटे ५ वाजता मंदिर उघडल्यावर ५-१५ वा. काकड आरती सुरू झाली. मोठया संख्येने साईभक्त आरतीला उपस्थित होते. आरती संपल्यावर ६ वाजतां श्रींच्या फोटोची व पोथींची मिरवणूक समाधि मंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साई सच्चरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. समाधि मंदिरातील नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी दुपारी ४ ते ६ पर्यंत ह. भ. प. डॉ. प्रा. नारायणराव राजदेरकर, एम. ए. पी. एच. डी. औरंगाबाद यांचे कीर्तन झाले. सायंकाळी धूपारती झाल्यावर ७–३० ते ९ पर्यंत व ९-३० ते ११ पर्यंत मुंबई नभोवाणीचे कलाकार व प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक श्री. जितेंद्र अभिषेकी यांचे सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ९-१५ ते ११–५५ पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस:**— शनिवार दि. २-१०-७६ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५-१५ वा. काकड आरती झाली. नंतर श्रीच्या फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थानमार्गे समाधिमंदिरात आली. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी ९ ते १२ पर्यंत भिक्षाझोळी कार्यक्रम झाला. मा. रिसीव्हर श्री. का. सी. पाठक यांनी स्वतः झोळी घेऊन उपस्थित साईभक्तांना झोळया दिल्या. मंदिरात समाधिचे दर्शन झाल्यावर झोळी मिरवणूक द्वारकामाईतून गावात गेली. शिर्डी गावात घरोघरी भिक्षेसाठी गेल्यावर सुवासिनींनी श्रीच्या निशाणाची पूजा आरती करून भिक्षाझोळीत गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, फळे, नारळ, पैसे अशी भिक्षा यथाशक्ती अर्पण करून प्रसाद घेतला. सकाळी १०-३० ते १२ पर्यंत श्रींचे पुण्यतिथी कीर्तन प्रा. डॉ. राजदेरकर यांनी केले. त्यानंतर माध्यान्ह आरती झाल्यावर तीर्थप्रसाद वाटण्यात आला. दुपारी १ ते ३ पर्यंत आराधना विधी कार्यक्रम मा. श्री. का. सी. पाठक रिसीव्हर यांचे हस्ते झाला. यजमान म्हणून त्यांनी पुरोहिताना धोतर, उपरणे व सुवासिनींना खण दिले.

सायंकाळी ५ वा. सीमोल्लंघन मिरवणूक वाजत गाजत खंडोबाचे देवाजवळ गेली. त्या ठिकाणी श्रींच्या निशाणाचे व शमीचे पूजन झाल्यावर सोने लुटण्याचा

कार्यक्रम झाला. धार्मिक पूजा विधी कार्यक्रम मा. रिसीव्हर यांनी केला. खंडोबा देवाचे दर्शन गावातील सर्व देवळात जाऊन उपस्थित लोकांना दर्शन घेतल्यावर मिरवणूक मंदिरात आली व धूपआरती झाली.

रात्रौ ९–१५ ते १२–३० पर्यंत श्रींच्या रथाची भव्य मिरवणूक गावातून निघाली होती. मिरवणूकीला मुंबईतील सुप्रसिद्ध श्रीकृष्ण बॅण्ड पथक अग्रभागी होते. सनई, चौघडा, सिंगवादन, डफ, श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय बँड पथक शिर्डी, राहाता व पिंपळवाडी येथील बँड पथके मिरवणूकी बरोबर होती. संस्थान कर्मचाऱ्यांचे लेझीम पथक, भजन, गायन कार्यक्रम झाले. प्रतिवर्षाप्रमाणे पुण्याचे नकलाकार श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर यानी निरनिराळे वेष धारण करून करमणूकीचे कार्यक्रम केले. त्याचप्रमाणे स्थानिक लोकांनी भारुड गारुड कार्यक्रम केले. मिरवणूक रात्रौ १२–३० वाजता मंदिरात आली व भक्त मंडळींनी कलाकारांच्या गायनाच्या कार्यक्रमात भाग घेतला. रात्रभर कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले होते.

**दसरा उत्सव ३ रा दिवस :–** रविवार दि. ३–१०–७६ रोजी पहाटे ६ वाजता श्रींचे मंगलस्नान झाले, गुरुस्थान ठिकाणी सकाळी ७–३० ते ८–३० पर्यंत रुद्राभिषेक झाला. नित्यकार्यक्रमाव्यतीरिक्त दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत प्रा. डॉ. नारायणराव राजदेरकर यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७–३० ते १० पर्यंत कु. मुक्ता भिडे, कु. सरला भिडे मुंबई यांचे गायनाचा जुगलबंदी कार्यक्रम झाला. १० ते १०–३० शेजारती झाल्यावर ११ वा. मंदिर बंद झाले.

**उत्सवाचा ४ था दिवस :–** सोमवार दि. ४–१०–७६ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५–१५ वा. काकड आरती झाली. ६ वा. श्रींचे मंगलस्थान झाले. नित्यकार्यक्रमा व्यतिरिक्त सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत, संस्थान गवई काव्यतिर्थ श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांचे कालाकीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर माध्यान्ह आरती झाली व तीर्थप्रसाद वाटण्यात आला. सर्व कार्यक्रम झाल्यावर रात्री १० ते १०–३० शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

**कोजागिरी पौर्णिमा :—** गुरुवार दि. ७–१०–७६ रोजी सायंकाळी ७–३० ते ९ वाजेपर्यंत श्री. नंदकिशोर मुळे यांचे गिटार वादन झाले. रात्रौ ९–१५ ते १० वाजेपर्यन्त गुरुवारचा पालखी कार्यक्रम झाला. १० ते १२ पर्यंत श्रींची पूजा व चंद्रपूजा मा. रिसीव्हर श्री. का. सी. पाठकसाहेब यांचे हस्ते झाली. उपस्थित भक्तमंडळींना दूध, पोहे वगैरे प्रसाद वाटण्यात आला. तसेच डॉ. के. बी. गव्हाणकर यांचे सालाबादप्रमाणे प्रवचन झाले, नंतर त्यांच्या सहकाऱ्यांनी भजन, गायन, वादन व करमणुकीचे कार्यक्रम करून रात्रभर जागर केला.

**दिवाळी** :— दि. २२-१०-७६ रोजी सायंकाळी ५ ते ६ पर्यंत लक्ष्मीपूजन कार्यक्रम मा. रिसिव्हरसाहेब यांचे हस्ते झाला. लक्ष्मीपूजन कार्यक्रमास साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुलांनी भुईनळे व फटाके उडवून आनंद व्यक्त केला. सर्वांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. पाडव्याचे दिवशी दिवाळीचा प्रसाद म्हणून, उपस्थित साईभक्तांना, स्थानिक लोकांना व गोरगरिबांना लाडू वाटण्यात आले.

**माननीयांच्या भेटी** :—

१) मान. श्री. शंकररावजी चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
२) मा. श्री. बी. जे. खताळ, न्याय व विधी खातेमंत्री, महाराष्ट्र राज्य
३) मा. श्री. दादासाहेब रुपवते, माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
४) मा. श्री. सप्रे, एअरमार्शल, भारत सरकार, लखनौ
५) मा. श्री. मुखोपाध्याय I A S. मॅनेजिंग डायरेक्टर, कोकणविकास महामंडळ.
६) मा. श्री. एस् जम्बुनाथन IAS. उपाध्यक्ष व महाव्यवस्थापक, म. रा. परिवहन मंडळ, मुंबई.
७) मा. श्री. गोविंद नारायण I C S. (रिटायर्ड) ॲडमिनिस्ट्रेशन ट्रिब्युनल आंध्रप्रदेश.
८) मा. श्री. शरदराव केळकर I A S. मॅनेजिंग डायरेक्टर सिकॉम, मुंबई.
९) मा. श्री. व्ही. एम. दिक्षीत A I G. भोपाळ.
१०) मा. श्री. भास्करन इनकमटॅक्स कमिशनर पुणे.
११) मा. श्री. आर. बी. सुळे. डिस्ट्रीक ॲ. सेशन जज्ज अ. नगर.
१२) मा. श्री. विद्यार्थी; डिस्ट्रीक जज्ज बडोदा.
१३) मा. श्री. पी. ना. सावंत, न्यायमूर्ती हायकोर्ट मुंबई.
१४) मा. श्री. ओ. के. गोपालन, चेअरमन युनियन बॅंक ऑफ इंडिया, मुंबई.
१५) मा. श्री. के. एम. पाटील, ग्रामविकास व आरोग्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली त्यांची नावे खालीलप्रमाणे.

**कीर्तन** :- १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने नेहमी-प्रमाणे झाली. २) डॉ. प्रा. नारायणराव राजदेरकर, औरंगाबाद. ३) श्रीमती कृष्णाबाई येवलेकर, सातारा ४) ह. भ. प. कपिलेश्वर आ. सोनवणे, आळंदी.

**गायन, भजन, वादन** :- १) श्री. जितेंद्र अभिषेकी, लोणावळा. २) श्री. तुळशीदास बोरकर, मुंबई. ३) श्री. नाना मुळे, मुंबई. ४) श्री. दत्ताराम ना. मुळे, मुंबई. ५) श्री. आपटे, मुंबई. ६) श्री. मंगेश मुळे, लोणावळा. ७) श्री. राजा काळे, लोणावळा. ८) श्री. शिवाजी तु. धुमाळ, शिर्डी. ९) श्री. शंकरराव रा. सालकर, कोपरगाव.

१०) श्री. नन्हेबाबू कुवर, बीदर, ११) श्री. भोलानाथ रा. समेळ, मुंबई. १२) श्री. दत्तोबा गुरव, शिर्डी. १३) श्री. शामसुंदर भेडा, संगमनेर. १४) श्री. आनंदगिरी गं. गोसावी, संगमनेर. १५) श्री. चंद्रकांत मेहता, मुंबई. १६) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिरडी. १७) श्री. रघुनाथ बा. सांडभोर, पुणे. १८) सौ. शरयु सा. मराठे, शिरडी. १९) श्री. रत्नाकर ना. कोराटे, शिर्डी. २०) कु. मंगला ग. जोशी, शिरडी. २१) कु. सुलभा रा. खोत, शिरडी. २२) सौ. शीला न. लाखाणी, मुंबई २३) श्री. लक्ष्मीकांत दे कापरे, अ. नगर. २४) श्री. यशवंतराव दवे, मुंबई. २५) श्रीराम वि. सातर्डेकर, मुंबई. २६) डॉ. एम. के. कीर्तिकर, मुंबई. २७) श्री. प्रदीप देशपांडे, मुंबई. २८) सौ. सविता सुरेश गिजरे, शिरडी. २९) श्री. राजेश्वर शं. देशमुख, उमरावती. ३०) श्री. अर्जुनराव बा. काकडे, नेवासा. ३१) श्री. धनंजय ना. म्हात्रे, वसई. ३२) श्री. पंडितराव मुळे, पाथर्डी. ३३) कु. जानका शेरीकर, शिरडी. ३४) कु. साईनाथ शेरीकर. ३५) श्री. भालचंद व कुलकर्णी, मुंबई. ३६) श्री. ज्ञानोबा ता. वाडेकर, शिरर्डी. ३७) श्री. शेखनबाव ड. पटेल, अरणगाव ३८) श्री. नारायण क्षीरसागर चिखळठाणा. ३९) श्री. देवीदास रा. अत्रेबुवा, औरंगाबाद ४०) श्री. राघु भा. सालकर, कोपरगाव ४१) श्री. सतिश रा. हेगडे, बेळगाव ४२) सौ. अंजली पांडे, पोहेगाव. ४३) श्रीकृष्ण ब्रॅण्ड पथक भोईवाडा, मुंबई ४४) श्री. रघुनाथ नागरे, शिर्डी. ४५) श्री. अत्रे औरंगाबाद. ४६) श्री. चंपत, औरंगाबाद ४७) कुमारी मुक्ता भिडे, मुंबई. ४८) कु. सरला भिडे, मुंबई. ४९) श्री. राणे, मुंबई. ५०) सदाशिव बाबुराव हाडकर, मुंबई.

**गायन भजन वादन :** ५१) श्री. अवधूत रावजी शिंदे व श्री साईबाबा संस्थान-लेजीम संघ शिर्डी. ५२) ह. भ. प. अंबिका तरुण भजनीमंडळ कोपरगांव. ५३) श्री. सुभाष ग. वनगे, ठाणे. ५४) श्री. नंदकिशोर मुळे मुंबई. ५५) श्री. रवि गो. गांधी, मुंबई.

**कोजागिरी पौर्णिमा कार्यक्रम :** १) डॉ. के. भ. गव्हाणकर, मुंबई. २) श्री. गंगाधर अ. सामंत. ३) श्री. विनायक, लाड. ४) श्री. अनंत पांचाळ ५) शाहीर श्री. सुखदेव कांबळी. ६) विलास बिरजे. ७) श्री. सुधाकर पाटील. ८) श्री. रामचंद्र भोगले. ९) श्री. अशोक सावंत. १०) श्री. एकनाथ धनवडे. ११) कुमारी माणिक मयेकर १२) कु. शोभा नाईक. १३) श्री. रविंद्र पांचाळ १४) श्री. अनिल देशपांडे. १५) श्री. बाळ तळगांवकर १६) सौ. सुनिता सावंत. १७) श्री. शशिकांत पुसाळकर. १८) श्री. श्री. नंदकुमार पीसाट. सर्वजण मुंबई. १९) श्री. कविश्वर इन्दोर. २०) ह. भ. प. विजय बाबा, नागपूर २१) श्रीमती इंदूबाई बा. सिंदगिकर, पंढपूर. २२) कु. प्रमिला ना. सिंदगीकर, पंढरपूर.

**भजन, गायन, वादन, किर्तन :** १) ह. भ. प. बाबूराव मु. चाव्हर बारामती. २) ह. भ. प. कपिलेश्वर, सोनवणे. ३) सौ. शकुंतला मो. जोशी, नाशिक. ४) श्री. पुरुषोत्तम श. जोग, पुणे. ५) श्री. के. टी. टिकू. मुंबई. ६) श्री. चंद्रशेखर

गाडगीळ व पार्टी आर्केस्ट्रा. ७) सौ. रश्मी गाडगीळ ८) श्री. चंदू पाटील. ९) श्री. भानुप्रसाद इंगळे. १०) श्री. मुकेश देदिया. ११) श्री. इकबाला कुमठे. १२) श्री. प्रदिप बकरे. १३) श्री. योगेश खान. १४) श्री. अशोक कुमार, सर्वजण पुणे. १५) श्री वसंत का. काडणेकर मुंबई. १६) श्री. नारायण सोमराज व भजन मंडळी, उल्हासनगर.

# शिरडी--वृत्त--माहे नोव्हेंबर १९७६

या महिन्यात श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी बाहेरगावची भक्त मंडळी बरीच आली होती. काही कलाकारांनी श्रींपुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे.

**कीर्तन :** १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली. २) श्रीमती जानकीबाई इंगळे, गोरेगाव, मुंबई यांचे कीर्तन.

**प्रवचन :—** १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिर्डी.
२) श्री. सुरजमलजी बडे पंडितजी राजस्थान.
३) ह. भ. प. जगन्नाथबुवा वाघचौरे, शिर्डी.

**भजन :—** १) भगवान श्रीसत्यसाई सेवा समिती युनिट ४ मुंबई. २) ह. भ. प. शिवरामबुवा वरळीकर भजन मंडळी, कोळीवाडा, मुंबई २५. ३) सौ. सीता लक्ष्मी आणि भजन मंडळी, पुणे २. ४) नवरंग साधना भजनी मंडळ, कान्हेगाव कोपरगाव ५) शिवप्रसाद भजनी मंडळ, उत्तरेश्वर पेठ कोल्हापूर. ६) श्री भगवती साई संस्थान भजन मंडळ, मुंबई २४. ७) श्रीसाईनाथ भजन मंडळ शिर्डी. ८) ज्ञानदिप गायन पार्टी भजन, ठाणे. ९) श्रीलक्ष्मी नायडू भजन, जबलपूर.

**गायन-वादन**

१) श्रीसाईप्रसाद, सौ. शोभना म. जावळे, मुंबई ५७. २) श्री. उदयशंकर पंडीत, मुंबई ९२. ३) श्री. जयवंत कुळकर्णी, मुंबई ५७. ४) श्री. मोहन कृ. कलंबी, मुंबई ५७. ५) श्री. अहमद पठाण. लक्ष्मीवाडी. ६) श्री. रत्नाकर ना. कोराटे, शिर्डी. ७) ह. भ. प. रामजी कारभारी सोनवणे बीड.

**माननीयांच्या भेटी :—**

१) मा. श्री. एन. के. पारेख सिटी सिव्हील व सेशन जज्ज, मुंबई.
२) मा. श्री. के. बी. नरसप्पा, मंत्री, शुगर, मागासवर्ग व वेलफेअर. आंध्रप्रदेश
३) मा. श्री. कांटावाला, चीफ जस्टीस, हायकोर्ट मुंबई.
४) मा. श्री. आर. जे. देवतळे, वन आणि ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र मुंबई.
५) मा. श्री. विजयसिंग ठाकूर I A S. जिल्हाधिकारी अहमदनगर.
६) मा. श्री. लाल I A S. मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे.

**हवापाणी :—** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# श्रीसाईलीला

## लेखक–कवी–वर्गणीदारांना महत्वाच्या सूचना

● अंक दर महिन्याच्या पहिल्या तारखेला टपालात पडतो.

● अंकात संत–पंत व श्रीसाईबाबा याविषयींचेच लेख व मजकूर प्रकाशित केल जाईल. अन्य वादग्रस्त व्यक्ती किंवा प्रसंगावर आधारित लेख अजिबात स्वीकार जाणार नाहीत. लेखातील मतांची जबाबदारी त्या त्या लेखकांची राहील.

● मासिकाकडे प्रसिद्धीसाठी पाठवावयाचे साहित्य सुवाच्य अक्षरात, कागदाच्य एकाच बाजूने लिहिलेले असावे.

● साहित्याची स्वीकृती किंवा अस्वीकृती लेखक वा कवींना व्यक्तीगत पत्र कळविणे त्यांना आवश्यक वाटल्यास त्यासाठी २५ पैशाची तिकिटे साहित्याबरोब पाठवावीत. नापसंत साहित्य असल्यास ते आठवड्यात परत केले जाईल. स्वीकृत साहि त्याचा निर्णयही लगेच कळविला जाईल.

● ज्या अंकात साहित्य प्रसिद्ध होईल तो भेट अंक संबंधित लेखक–कवीक कात्रणासहित पाठविला जाईल व आठवड्याभरात प्रसादही पाठविला जाईल.

● श्रीसाईलीलेची वार्षिक वर्गणी पाठविताना मासिकाची आवृत्ती मराठी पाहि की इंग्रजी याचा स्पष्ट उल्लेख आवश्यक आहे. तसा नसल्यास मराठी अंक पाठ विला जाईल.

● सर्व अंक कार्डाप्रमाणे १ तारखेला टपालात पडतातच. तेव्हा निदान ५ तारखेपर्य तरी अंक सर्वांना ठिकठिकाणी मिळतातच. अंक पोस्टात गहाळ होतात व वाचकांना मिळत नाहीत अशा तक्रारी येतात. पण संस्थान या बाबतीत काही करू शकत नाही. तक्रार आल्यावर चौकशी करून अंक शिल्लक असल्यास पाठविला जाईल.

● नमुना अंक मोफत पाठविणे केवळ अशक्य आहे. तो हवा असल्यास ८ पैशांची पोस्टाची तिकिटे पाठवून मागवावा. मागील महिन्याचे अंक अजिबात शिल्ल नसतात. सरकारी नियमाप्रमाणे व कागदाच्या पुरवठ्यानुसार जेवढ्यास तेवढेच अं छापावे लागतात. तरी जुन्या अंकांच्या मागणीसाठी पत्र व्यवहार करू नये.

लेखकांनी आपल्या लेखांच्या वा कवितांच्या वर उजव्या बाजूस आपले पू नाव व पत्ता लिहिणे आवश्यक आहे. लेखाची स्थळप्रत त्यांनी न चुकता आपल जवळ ठेवावी. साहित्याचे संपादन कार्य करताना त्याती आक्षेपार्ह वाटणारा मजकूर काढून टाकणे किंवा भाषा सुधारून घेणे व बाबतीत संपादक व त्यांनी नेमलेले तज्ञ त्यांना पूर्ण व अंतीम अधिकार राहतील. ले किंवा कविता स्वीकृत किंवा अस्वीकृत करण्याचाही पूर्ण अधिकार त्यांना राहिल.

श्रीसाईलीला मासिकाच्या बाबतीत सर्व प्रकारचा पत्रव्यवहार–संपाद श्रीसाईलीला, 'साईनिकेतन', प्लॉट क्रमांक ८०४–बी, डॉ. आंबेडकर पथ, दा मुंबई १४ पिन ४०००१४ दादर (पूर्व) येथेच करावा.

## श्रीसाईलीला

# लेखक—कवींचे तृतीय स्नेहसंमेलन

## शिर्डी—१९७७

श्रीसाईलीलेच्या लेखक–कवींचे तिसरे स्नेहसंमेलन शिर्डीक्षेत्री रविवार दिनांक ३० व सोमवार दिनांक ३१ जानेवारी १९७७ या दोन दिवशी भरविण्यात येत आहे. या निमित्ताने श्रीसाईलीलेच्या लेखक–कवींचा परस्पर परिचय होण्याची सुवर्णसंधि मिळणार असून यातूनच श्रीसाईलीलेच्या विकासयोजनेच्या दृष्टीने भावी कार्य करण्यास अवसर मिळणार आहे.

या दोन दिवसांच्या स्नेहसंमेलनात श्री बाबांचे दर्शन, मेळावा, सांस्कृतिक कार्यक्रम, परिचय कार्यक्रम, श्रीसाईलीलेत काय काय असावे, श्रीसाईलीलेची आणखीन उत्तरोत्तर प्रगती कशी काय साधता येईल ? इ० विविध विषयांवर चर्चा असा भरगच्च कार्यक्रम आयोजिला जाईल.

श्रीसाईलीलेच्या लेखक–कवी यांची निवास भोजनाची सारी व्यवस्था श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी यांचेतर्फे करण्यात येणार आहे. तरी या संमेलनास हजर राहू इच्छिणाऱ्यांनी मे. रिसिव्हर साहेब, श्री. का. सी. पाठक, श्रीसाईबाबा संस्थान, मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर, ता. कोपरगांव यांचेकडे २० जानेवारी १९७७ पर्यंत पत्रव्यवहार करून आपल्या आगमनाची सूचना त्यांना देऊन आपली जागा आरक्षित करावी म्हणजे व्यवस्था करणे ठीक पडेल. संमेलनास येणाऱ्या लेखकांनी शनिवार दिनांक २९ जानेवारीपूर्वी येऊ नये.

● मुंबईहून जाणाऱ्या लेखक मंडळींनी शनिवार दि. २९ रोजी दुपारी १२ वाजता मुंबई सेंट्रल एस. टी. मुख्य स्थानक क्रमांक एकच्या फलाटावरून सुटणाऱ्या एस. टी. बसने जावे. म्हणजे त्यांना सोयीचे होईल. ही एस. टी. बस मुंबई, ठाणे, नाशिक, सिन्नर, कोपरगाव मार्गे शिर्डीस जाते. ती रात्री सुमारे नऊ वाजता शिर्डीस पोचते. लेखक–कवी मंडळींनी आपापली आरक्षित तिकिटे आपण स्वतःच स्वतंत्रपणे काढावीत. यापूर्वी मुंबई कार्यालयाकडून व्यवस्था केली जात असे परंतु यंदा मुंबई कार्यालयाकडून तशी व्यवस्था करणे किंवा जबाबदारी स्वीकारणे केवळ अशक्य आहे. २० जानेवारीनंतर या स्नेहसंमेलनाचे शिर्डींच्या जागेच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार मुळीच करू नये.

निमंत्रक
**श्री. का. सी. पाठक**

कार्यवाह
**डॉ. श्री. दि. परचुरे**
**श्री. सदानंद चेंदवणकर**

५२

# ॥ महानिर्वाण ॥

धन्य माता पिता जगी भाग्यवंत
पुत्र भगवंत प्रसवला

कोटी पुण्य फळ स्वरूप सुंदर
बाल भगवान जन्मा आले

बालक विरागी संसारी उदास
घेई वनवास आनंदाने

कांहीं काळ घोर कठोर साधना
कैवल्याचें ज्ञाना दर्शविले

उपदेश जना अखंड भ्रमंती
सत्य सुख शांती प्रवर्तली

सद्धर्म पताका उभवी दिगंत
योगीराज संत साईबाबा

कर्तव्य पूर्तीनें निरोप घेतला
निजात्मा मोकळा मोक्षधामीं

महानिर्वाण झालें तो मुक्ति सोहळा
दीपक उजळा शुभदिनी.....

शशिकला साळगांवकर
मुक्ता निवास, १५५ ब, नवी पेठ, सोलापूर

# आरति गाऊ साईनाथा

उद्धारा विश्वाच्या नाथा ॥ धृ० ॥

माझे दत्तगुरू साई
होऊं कैसा उतराई ?
सत्पदिं टेकवीन माथा ! ॥ १ ॥

सारखे शिरडी बोलविते
मनावर उत्सुकता होते
झरतसे अश्रूंची सरिता ! ॥ २ ॥

कोण मी ? कोठुनि गा आलो ?
मीच मज कैसा विस्मरलों ?
तोच मी ! बिंबू दे आतां ! ॥ ३ ॥

नाम हें मधुर मधुर साई
वाटते चित्ता अंगाई
उदी ही तीट होय भक्ता ! ॥ ४ ॥

प्रेममय जीवन मन व्हावें
दुजेपण निमिषीं विलयावें
तथास्तु ! म्हणा साईनाथा ! ॥ ५ ॥

स्वरूपी रमती ते संत
जनांसी धीर देत संत
भक्तिपथ दिसो गुरुनाथा ! ॥ ६ ॥

अहंता पूर्ण पूर्ण जावी
माधवी वृत्ती रंगावी
राम नच मागे अधिक अतां ! ॥७॥

श्रीराम आठवले,
बलवंत सदन, ३४४ नवी पेठ, पुणे-३०.

५५

# साईलीला

तुझ्या दर्शनासी आलो
आणि तुझा झालो
भक्तीरंगी न्हालो, साई भक्तीरंगी न्हालो ॥ ध्रु० ॥

पाहुनी तव सुंदर रूप
हरलो चिंता आपोआप
आनंदा ना उरले माप
कृतार्थ मी झालो ॥ १ ॥

दयाघन असशी साई भक्तांचा कैवारी
रूद्धी, सिद्धी यांची वस्ती असे तुझ्या दारी
श्रद्धा अन् सबुरीची लेवुनी मी शिदोरी
तृप्त आज झालो ॥ २ ॥

तुझ्या दारी सारे एक, हिंदु वा यवन
भक्त इच्छा जाणिसी देवा तुच भगवान
कृपेचा तव वरदहस्त हेचि द्यावे दान
चरणी लीन झालो ॥ ३ ॥

जळी स्थळी काष्टी पाषाणी तुच मज दिसावे
काया वाचा मन माझे तुझे रूप व्हावे
तुझियारंगी रंगताना भान ना उरावे
तुझाच मी झालो ॥ ४ ॥

अशोक वाळंज,
ब्लॉक बी- ८/४, सेक्टर—६, वाशीनगर,
नवी मुंबई- ४०००७० ३.

# ॐ श्री साई स्तवन

कोणाचा बघ आजला नच उरे आधार वा धीर तो.
तेव्हां त्या स्मरता मनी झडकरी साई उडी घालतो.
तूं जाता शिरडीसना सुखदती यात्रा घडे सुंदर.
श्रद्धेने मन लोभता मन भरे प्रेमा फुटे पाझर ॥ १ ॥

साईच्या स्मरणे पहा मन कसे भारावुनी जात ते.
साईची शुभ कामना सतत ती राहो शिरी इच्छिते.
आत्म्याला यश पावता बघ इथे दे दान ते भक्तिचे.
दाता तो करता कृपा सुखद ते साऱ्या बरे जन्मिचे ॥ २ ॥

साईराम मुखी सदा वद तजा ध्यानी मनी ध्यासतो.
डोळ्यानी बघता पहा मनि कसा होतो सदा हर्ष तो.
साईच्या हृदयी वसे सतत ना अल्ला तसा राम तो.
जीवाला सुख वाटते गुरूपदीं होता मनी बोधतो ॥ ३ ॥

—विष्णु वासुदेव कौलगेकर,
तळेगांव.

---

# धर वाट शिर्डीची

दवडु नको घडी मानवा ही लाख मोलाची
शिरडी पती साईंचे दर्शनाची
सार्थकता होईल तरीच तुझे जीवनाची
असतील केली लाख पापे जन्मोजन्मीची
जळुन भस्म होतील सर्व, चढता पायरी समाधीची
वाट पाहे कनवाळू मावली आपल्या वत्साची
होईल सुटका तुझी मानवा जन्ममृत्यूतून अखेरची
टळेल फेरी तुझी चौऱ्यांशी कोटी योनीची
उच्चारीता नाम साई, वाटेल गोडी अमृताची
गुंतूनी मोह पाशात दवडीशी का घडी लाख मोलाची
जागा हो, उठ आता तरी, धर वाट शिरडीची

पांडुरंग मिराशे
किनवट, जि. नांदेड.

# श्री साईमाऊली

श्री साई माऊली भगवती शारदे
नमोस्तूते नमोस्तूते नमोस्तूते ।
तुझ्या चरणी कमळे फुलती
सहवासे हृदये विकसती
भाव अंतरीचे येथेच प्रसवती
ॐकारे नादे भरला
जीव कळीला रंगे रंगला
ब्रम्हानंदे भान हारपला
साई नामे जीव अमृत प्याला ॥

सौ. कलावती वसंतराव चव्हाण,
बी/६, अंबाबाई मिस्त्री निवास, सेनापती बापट मार्ग,
दादर, मुंबई– २८

---

# पवित्र मरण—

कपाळी केशरी गंध
साई ! तुझा मला छंद
तुझ्या भक्तीचा गंध
त्यांत होऊनि धुंद
करिता लोचने बंद
साई व्यापिती रंध्र रंध्र
नेत्री येता तें पवित्र चरण
आंस एक मनीं दाटे
भक्ती रसांत न्हातां न्हातां
आतां यावें पवित्र मरण.

—उज्ज्वल वा. कुलकर्णी,
८९६/१, तांबोळी गल्ली, नंदुरबार, जि. धुळे.

# साधु संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ।



पण केवळ साधु संतच नव्हे तर प्रत्यक्ष "रामावतारी" "कृष्णावतारी" "दत्तावतारी" भगवान् सच्चिदानंद सद्‌गुरू **श्रीसाईबाबा** (शिरडीचे) आपल्या घरी येतील तो तुमच्या आयुष्यातील **'सोनियाचा दिस'** होय.

आजच श्रीसाईबाबांची शीलाखंडावरील पूर्णाकृती पंचधातूची (ब्रॉंझ) अभंग मूर्ति खरेदी करून आपल्या घरी बाबांना कायमच्या वास्तव्याला बोलवा. मग काय रोज पूजा आरती नैवेद्य म्हणजे जणू काय **"झाहले घराचे मंगल देऊळ !"**

अशा तऱ्हेने साईभक्ताचे प्रत्येक घर हे एक लहान का होईना पण प्रत्यक्ष बाबांचे मंगल देऊळ बनावे अशी इच्छा मनी धरून आम्ही श्रीसाईबाबांची ९ इंच उंच व ५ इंच रुंद अशी पंचधातूची अत्यंत मजबूत अशी मूर्ति बनविली आहे. जिला अगदी लहान मुलांपासूनसुद्धा फारसे जपावे लागत नाही.

मूर्तीचे खास वैशिष्टच म्हणजे ती पंचधातूची व योग्य साईजची बनविल्यामुळे एक तर मूर्ति ताम्हनांत ठेवून तिला सुवासिक अत्तराने अगर पंचामृताने स्नान, अभिषेक घालता येतो. तसेच मूर्तीला डोक्यावर शिरपेंच, मुकुट इत्यादि अलंकार व फेटा अगर इतर रंगीबेरंगी पोषाखाने मूर्ति अत्यंत शोभिवंत करून आपल्याला कमालीचे मानसिक समाधान मिळते.

मूर्तीची किंमत अत्यंत वाजवी ठेवली आहे !

तसेच श्रद्धावंत भक्तांच्या काही अडचणीही आम्ही लक्षात घेऊन योग्य प्रकारे सहाय्य करू ! बाहेरगावी मूर्ति पोस्टाने अगर व्ही. पी. ने पाठवू.

"मूर्तीच्या स्थापनेसाठी सुबक डिझाईनचे लाकडी देव्हारे उपलब्ध आहेत."

अधिक माहिती वा इतर तपशिलासाठी प्रत्यक्ष भेटा अगर लिहा :—

**श्री. मनोहर घनःशाम पितळे,**

पितळेवाडी, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०,००५७

फोन नंबर : ५७ ६२ ९८. भेटण्याची वेळ : सकाळी ७ ते ९ रात्रौ ७ ते ९.